❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper
www.sandhyaepaper.com

# पुण्यात बाप्पांचे जल्लोषात आगमन

**ढोल-ताशांचा गजर, फुलांचे रथ आणि सामाजिक जाणिवा**

■ परंपरेचा मान राखत आणि ढोल-ताशांच्या निनादात यंदाच्या गणेशोत्सवाला पुण्यात अत्यंत उत्साहात आणि दणक्यात सुरुवात

■ पुणे (दै. संध्या)

"येळकोट येळकोट जय मल्हार", "बोल बजरंग बली की जय" आणि लाडक्या "गणपती बाप्पा मोरया"च्या जयघोषाने आज पुणे शहर अक्षरशः दुमदुमून गेले आहे. परंपरेचा मान राखत आणि ढोल-ताशांच्या निनादात यंदाच्या गणेशोत्सवाला पुण्यात अत्यंत उत्साहात आणि दणक्यात सुरुवात झाली आहे. सकाळच्या सूर्योदयापासूनच लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता, केळकर रोड आणि मध्यवर्ती पेठांमधील रस्ते हजारो भाविकांनी व तरुणांनी फुलून गेले आहेत. मानाचे गणपती तसेच विविध सार्वजनिक मंडळांच्या बाप्पांच्या मिरवणुकीने यंदा वातावरण अधिकच भारावून टाकले आहे. यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे भव्य आणि फुलांनी सजवलेले दिव्य रथ ठरत आहेत. या आकर्षक रथांमध्ये विराजमान झालेले बाप्पा डोळ्यांचे पारणे फेडत आहेत. विशेषतः, यंदाच्या मिरवणुकीत गुलाबाचा वापर काहीसा कमी करून इतर रंगांच्या वैविध्यपूर्ण फुलांची उधळण आणि आकर्षक सजावट पाहायला मिळत आहे.

केवळ धार्मिक श्रद्धाच नव्हे, तर यंदाच्या उत्सवात सामाजिक संदेशांचाही मोठा प्रभाव दिसून येत आहे. अनेक मंडळांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे देखावे उभारण्यात आले आहेत. यामध्ये प्रशासकीय शिस्त आणि कर्तव्यकठोर भूमिकेसाठी ओळखल्या जाणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीचा प्रभाव दर्शवणारे फलक व देखावे लक्ष वेधून घेत आहेत. तसेच, "डीजे मुक्त गणेशोत्सव" या संकल्पनेला लोकांचा कसा पाठिंबा मिळत आहे, हे दाखवणारे जनजागृतीपर पोस्टर आणि फलक संपूर्ण शहरात चर्चेचा विषय ठरले आहेत. पर्यावरणपूरक आणि पारंपरिक वाद्यांच्या या प्रवाहाला नागरिकांची मोठी पसंती लाभत आहे. पुण्याचे वैभव असलेल्या नामांकित ढोल-ताशा पथकांनी मिरवणुकीत शिस्तबद्ध आणि दमदार वादनाने जान आणली आहे. प्रमुख पथकांच्या वादनावर तरुणाई आणि बालगोपाळांनी ठेका धरला आहे. विशेष म्हणजे, पथकांमध्ये लहान मुलांचा आणि महिलांचा सहभाग लक्षणीय असून, ते तितक्याच उत्साहाने वादन करताना दिसत आहेत. प्रत्येक चौकात नागरिकांच्या कॅमेऱ्यांचे लेन्स या ऐतिहासिक क्षणांना आणि ढोल पथकांच्या कसरतींना टिपण्यासाठी सरसावले आहेत.



सार्वजनिक मंडळांसोबतच घराघरांमध्येही बाप्पाच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा अत्यंत चैतन्यमय वातावरणात पार पडला आहे. पहाटेपासूनच घरोघरी मूर्तीची स्थापना करून विधिवत पूजा करण्यात आली. संध्याकाळनंतर या मिरवणुका अधिक रंगतदार होणार असून, आकर्षक रोषणाई (लायटिंग) आणि जिवंत देखाव्यांचा आनंद घेण्यासाठी पुणेकर रात्री उशिरापर्यंत रस्त्यांवर गर्दी करणार आहेत. पोलिसांच्या उत्तम सहकार्यामुळे आणि नागरिकांच्या शिस्तबद्ध सहभागामुळे यंदाचा गणेशोत्सव सुरळीत आणि अत्यंत आनंदाच्या वातावरणात पुढे जात आहे.

# दिशा सालियन प्रकरणाला नवं वळण

आदित्य ठाकरेंसह उद्धव ठाकरे, अनिल देशमुखांच्या नावाचा उल्लेख; सीबीआयकडून नवा एफआयआर दाखल

■ मुंबई (दै. संध्या)

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला आता पुन्हा एक नवं वळण लागलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात नव्याने आदेश दिल्यानंतर सीबीआयने एफआयआर दाखल केला आहे. त्यामध्ये आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासह अनेकांची नावे असल्याचं उघड झालं आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या जबाबानुसार नवा एफआयआर नोंदवण्यात आला आहे. 8 जून 2020 रोजी मुंबईतील मालाड इथे एका इमारतीच्या 14 व्या मजल्यावरून पडून दिशा सालियनचा मृत्यू झाला होता. दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच 14 जून 2020 रोजी अभिनेता सुशांत सिंह राजपूतने त्याचं जीवन संपवलं होतं. आता सीबीआयनं एफआयआर दाखल केल्याने याप्रकरणाला नवं वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणी सीबीआयनं मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार नव्याने गुन्हा दाखल केला आहे. एफआयआरमध्ये दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या जबाबाचा उल्लेख आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रकरण दडपण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असा आरोप सतीश सालियन यांनी केला आहे. या जबाबात उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह, एन्काऊंटर स्पेशलिस्ट सचिन वाझे, अभिनेता सूरज पांचोली,



दिनो मोरिया, रिया चक्रवर्ती यांच्या नावांचाही उल्लेख आहे. फाइल्स आणि सरकारी नोंदी नष्ट करणे किंवा दडपणे, त्यात फेरफार करणे, आरोपींना वाचवण्यासाठी सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग करणे, यासारख्या प्रकरणांची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी सतीश सालियन यांनी जबाबात केली आहे.

बड्या नावांसोबत दिशा सालियानच्या वडिलांनी मुंबई पोलिसातील काही अधिकाऱ्यांच्यावरही आरोप केले आहेत. त्यामध्ये पोलीस उपाआयुक्त विशाल ठाकूर, पोलीस निरीक्षक जगदेव कलापाड, पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, पोलीस निरीक्षक चिमाजी जाधव, पोलीस निरीक्षक अर्जुन राजने आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक देवढे यांच्यावरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. दरम्यान, या प्रकरणावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची फाईल आधी याच सरकारने बंद केली होती. आता या प्रकरणात सुडाचं राजकारण नाकारता येत नाही, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

## थोडक्यात...

### उन्मादीपणावर सुबोध भावेंचा परखड सवाल

पुणे : दैनिक संध्या

गणेशोत्सव म्हणजे भक्ती, सामाजिक एकोपा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सकारात्मक ऊर्जा यांचा संगम मानला जातो. मात्र, गेल्या काही वर्षांत उत्सवाच्या नावाखाली वाढणारा मोठा आवाज, डीजेचा दणदणाट, बेशिस्त नृत्य आणि अवाढव्य गणेशमूर्ती यामुळे उत्सवाच्या मूळ उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. याच मुद्द्यावर अभिनेता सुबोध भावे यांनी स्पष्ट आणि परखड भूमिका मांडली आहे. गणरायाचे आगमन झाल्यानंतर पुण्यातील आपल्या निवासस्थानी त्यांनी गणेशोत्सवाच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केले. उत्सवातील वाढता उन्माद हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून त्याचा समाजावर आणि विशेषतः तरुण पिढीवर परिणाम होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सुबोध भावे यांच्या मते, लोकांनी एकत्र यावे, संवाद साधावा, विचारांची देवाणघेवाण करावी आणि समाजात सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने गणेशोत्सवाची परंपरा विकसित झाली. मात्र, आज काही ठिकाणी उत्सवाचे स्वरूप बदलताना दिसत आहे. गणपतीसमोर मोठ्या आवाजात गाणी वाजवणे किंवा अचकट-विचकट नृत्य करणे याचा भक्तीशी आणि उत्सवाच्या मूळ संकल्पनेशी नेमका काय संबंध आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### मनोज जरांगेंचा आंदोलनासाठी नवा अर्ज

पुणे : दैनिक संध्या

मनोज जरांगे पाटील यांचं मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटीमध्ये आंदोलन सुरू आहे. आज त्यांच्या उपोषणाचा 17 वा दिवस आहे. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्याकडून मुंबईमध्ये येऊन उपोषण करणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने उपोषणाला परवानगी मिळावी यासाठी मुंबईच्या आझाद मैदान पोलिसांकडे अर्ज करण्यात आला होता. परंतु पोलिसांनी दोनदा त्यांना या उपोषणासाठी परवानगी नाकारली आहे. त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा तिसऱ्यांदा परवानगीसाठी अर्ज केला आहे. जी कारणं सांगून पोलिसांनी मनोज जरांगे पाटील यांना उपोषणाची परवानगी नाकारली होती, त्या सर्व अटींचं पालन करण्यास आपण तयार असल्याचं या अर्जामध्ये जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मराठा समाजाच्या न्याय आणि प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान, मुंबई येथे शांततेच्या मार्गाने जाहीर उपोषण करण्यात येणार आहे. सदर आंदोलन संपूर्णत: शांततेच्या मार्गाने, लोकशाही आणि घटनात्मक चौकटीत राहून करण्यात येणार असून, त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याची आयोजकांकडून पूर्ण दक्षता घेतली जाईल असं या अर्जामध्ये म्हटलं आहे.

# पुण्यात गणेशोत्सवात आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंच्या धडक कारवाईची चर्चा

■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहरात वैभवशाली गणेशोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली असून, मानाच्या गणपतींसह विविध सार्वजनिक मंडळांचे बाप्पा वाजत-गाजत आणि ढोल-ताशांच्या गजरात दिमाखात विराजमान होत आहेत. परंपरेनुसार काढण्यात आलेल्या मिरवणुकांमध्ये हजारो भाविकांची गर्दी झाली असून, पुणेकरांचा हा लाडका उत्सव अत्यंत शिस्तीत आणि जल्लोषात सुरू आहे. मात्र, यंदाच्या बाप्पाच्या आगमनासोबतच पुण्याच्या लक्ष्मी रस्त्यावर एका वेगळ्याच विषयाची जोरदार चर्चा रंगली आहे, जी सध्या सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे. यंदाच्या गणेशोत्सवात अन्न आणि औषध प्रशासनाचे प्रमुख आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या नावाचा आणि त्यांच्या धडक कारवाईचा प्रभाव थेट गणपतीच्या मिरवणुकीत पाहायला मिळाला. लक्ष्मी रस्त्यावरील प्रसिद्ध 'वीर हनुमान मित्र मंडळाने' आपल्या गणपतीच्या रथावर आणि देखाव्यात तुकाराम मुंढेंचे छायाचित्र असलेले लक्षवेधी पोस्टर्स लावले आहेत. "नियम हे पाळण्यासाठीच असतात" आणि "प्रसादात अन्न भेसळ चालणार नाही" अशा मजकुराच्या या पोस्टर्सद्वारे मंडळाने मुंढेंच्या कडक प्रशासकीय भूमिकेला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. या अनोख्या माध्यमातून गणेशोत्सवातही नागरिकांचे प्रकृती आरोग्य आणि शुद्ध आहाराबाबत प्रबोधन करण्याचा प्रयत्न मंडळाने केला आहे. गेल्या काही काळापासून तुकाराम मुंढे यांनी अन्नपदार्थ व औषध भेसळ करणाऱ्यांवर राज्यभरात अत्यंत कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. मुंढेंच्या या धडक मोहिमेमुळे अन्न व औषध व्यवसायात खळबळ उडाली असून नियम मोडणाऱ्या व्यावसायिक व दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. पुण्यातही काही दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई करत मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त पनीर आणि खव्याचा साठा जप्त केला होता.




■ वीर हनुमान मित्र मंडळाचे अनोखे पोस्टर

# श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती विराजमान

■ पुणे (दै. संध्या)

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी सार्वजनिक गणपती ट्रस्ट'चा बाप्पा मोठ्या जल्लोषात आणि भक्तीमय वातावरणात 'श्री गणेश सुवर्णधाम मंदिरा'त विराजमान झाला. जगप्रसिद्ध बासरीवादक पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या हस्ते दुपारी साडेबाराच्या सुमारास मंत्रोच्चारात बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. तत्पूर्वी, ढोल-ताशा पथकांच्या गजरात मोठ्या थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकी दरम्यान इंद्रधनुष्यातील सप्तरंगाची उधळण आणि बुधवार चौकात सात थर रचून करण्यात आलेले बाप्पाचे जंगी स्वागत हे विशेष आकर्षण ठरले. या आगमन मिरवणुकीत हजारो भाविक सहभागी झाले होते.

दरवर्षीच्या प्रथा परंपरेप्रमाणे सकाळी ट्रस्टचे उत्सव प्रमुख व विश्वस्त पुनीत बालन व जान्हवी धारीवाल-बालन या दांपत्याच्या हस्ते रंगारी भवनात श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाची विधीवत पूजा व आरती झाली. त्यानंतर आढाव बंधूचे नगारा वादन झाले. त्यानंतर आकर्षक फुलांनी आणि केळीच्या पानांच्या खुंटांनी सजविलेल्या पारंपरिक रथात बाप्पाच्या मिरवणुकीला सुरुवात झाली. यावेळी भवन परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते. रंगारी भवनापासून मुख्य मिरवणुकीला सुरुवात झाली. श्री छत्रपती शिवाजी महाराज



रस्त्याने पुढे बुधवार चौक, अप्पा बळवंत चौक आणि बाजीराव रस्त्यावरून ही भव्य मिरवणूक दिमाखात निघाली. मिरवणुकीत श्रीराम पथक, नादब्रह्म, ज्ञानप्रबोधिनी, आवर्तन, वाद्यवृंद, समर्थ, शिवाय शंखनाद यांसारख्या प्रसिद्ध ढोल-ताशा पथकांनी आपल्या अप्रतिम वादनाचा नजराणा पेश केला.

मिरवणूक बुधवार चौकात पोहोचताच तिथे कसबा, पुणे दहीहंडी संघाच्या गोविंदांनी मानवी मनोरे (थर) रचून बाप्पाला अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात मानवंदना दिली. यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी व भक्तांनी हवेत सप्तरंगांची उधळण केली. ढोलांच्या तालावर नाचणारे तरुण-तरुणी, हवेतील विविधरंगी गुलाल आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या घोषाने संपूर्ण बुधवार चौक दुमदुमून गेला होता. दुपारी साडेबाराच्या सुमारास आगमन मिरवणूक श्री गणेश सुवर्णधाम मंदिरासमोर पोहोचल्यानंतर बाप्पांची मूर्ती अत्यंत देखण्या आणि सुशोभित मखरात विराजमान करण्यात आली. प्रसिद्ध बासरी वादक पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या हस्ते बाप्पाची विधीवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

> "दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची बाप्पाची आगमन मिरवणूक अत्यंत उत्साहात पार पडली. ज्येष्ठ बासरीवादक पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या शुभहस्ते गणरायाची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. बाप्पाच्या आगमनाने आम्हाला अतिशय आनंद झाला असून पुढील दहा दिवस हा आनंद असाच कायम राहणार आहे. राज्यावरील सर्व विघ्न दूर कर आणि भरपूर पाऊस पडून सर्वत्र आनंदीआनंद व्हावा, सर्वांना सुख, शांती, आरोग्य, धनसंपदा लाभावी, अशी प्रार्थना आम्ही बाप्पाकडं केली."
>
> **- पुनीत बालन (उत्सवप्रमुख आणि विश्वस्त, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट)**

# 'दगडूशेठ' : 'प्रेम मंदिर' सजावटीच्या विद्युत रोषणाईचे उद्‌घाटन

*केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते विद्युत रोषणाईचे उद्‌घाटन*

■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षी गणेशोत्सवात वृंदावन मधील प्रेम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्‌घाटन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झाले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, विश्वस्त रोहित लोंढे, पराग वांबुरे, राजेंद्र गावडे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री राधा-कृष्णांप्रती असलेले दिव्य प्रेम, भक्तीचा वास असलेल्या प्रेम मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात साकारण्यात आली असून भाविकांकरिता प्रेमभावनेत तल्लीन करणारा आध्यात्मिक प्रवास यानिमित्ताने घडविण्यात येत आहे. नानाविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या मंदिराची प्रतिकृती सुमारे १०० फूट इतकी आहे.

प्रतिकृतीच्या रचनेत संगमरवरी वास्तुकलेपासून प्रेरित भव्य दर्शन भाग आहे. उत्तर भारतीय मंदिराच्या पारंपरिक रचनेचे प्रतिबिंब दर्शवणारी कलाकुसर केलेले स्तंभ आणि घुमट, रासलीला, गोवर्धन लीला, झुला यांसारख्या



कृष्णलीला दर्शविणारे शिल्पपट देखील आहेत. शोभिवंत फुलांची सजावट, पवित्र शुभचिन्हे आणि आकर्षक विद्युतरोषणाईमुळे सायंकाळनंतर हे मंदिर उजळून निघाले.

प्रारंभी बुधवार चौकामध्ये भव्य कमान साकारण्यात आली असून त्यावर आकर्षक नक्षीकाम केले आहे. मुख्य प्रतिकृतीच्या दोन्ही बाजूंना असलेल्या रनिंग मांडवावर कृष्णलीलेतील विविध प्रसंग साकारण्यात आले आहेत. मंदिराच्या वर दर्शनी भागात राधा-कृष्णाची भव्य मूर्ती देखील आहे. प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच आहे. यामध्ये अनेक भव्य खांब असून विविध मूर्ती देखील आहेत. गाभारा व मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रींचे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक नितेश कुमार आणि ग्लिटरी इव्हेंट्स प्रा. लि. यांनी मंदिराच्या प्रतिकृतीचे काम केले आहे.

# अभिनेत्रीला अडवून धमकावण्याचा प्रयत्न

■ पुणे (दै. संध्या)



'लागिरं झालं जी' या मालिकेतील अभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांच्याशी शहरातील नवले पुलाजवळ किरकोळ अपघाताच्या वादातून दोघांनी अरेरावी करून मारहाण करून धमकावण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी दोघांविरुद्ध नऱ्हे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांनी फिर्याद दिली आहे. शुक्रवारी (दि. ११) रात्री मुंबईहून साताऱ्याला जात असताना कल्याणी यांच्या गाडीला संबंधितांच्या गाडीची किरकोळ धडक झाली. त्यानंतर दोघांनी कल्याणी यांची गाडी अडवून त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. वाद वाढल्यानंतर संबंधितांनी त्यांचा हात ओढून जबरदस्तीने आपल्या गाडीत घेऊन जाण्याचा प्रयत्न केल्याचे म्हटले आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या कल्याणी यांनी प्रतिकार केला. त्यानंतर दोघेही घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेची माहिती कल्याणी यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करून दिली. किरकोळ अपघाताच्या कारणावरून महिलेशी अशा प्रकारे अरेरावी आणि जबरदस्ती केली जात असल्याने महिलांच्या सुरक्षेबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. नऱ्हे पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पसार झालेल्या आरोपींचा शोध सुरू आहे.

दैनिक संध्या
मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकण येथील संग्रामदुर्ग किल्ल्याला जपानच्या उद्योजकांची भेट

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण येथील ऐतिहासिक संग्रामदुर्ग किल्ल्याला जपानहून आलेल्या ख्वाशिमा व त्यांचा चिरंजीव युकी यांनी सदिच्छा भेट देऊन किल्ल्यातील सौंदर्याचे कौतुक केले. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके, निवृत्त शिक्षक प्रा. राजू दीक्षित व उपाध्यक्ष राहुल वाडेकर आदींनी जपानच्या या उद्योजकांना किल्ल्याबद्दल सर्व इत्यंभूत माहिती दिली. ॲड. किरण झिंजुरके यांनी प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचे स्वागत केल्याने ते दोघेही भारावून गेले. राजू दीक्षित यांनी त्यांना इंग्रजी भाषेतून, तर शेखर परदेशी यांनी जपानी भाषेतून माहिती दिली. जपानी पाहुण्यांना आपण संग्राम दुर्गमध्ये कसे, असे विचारले असता त्यांनी आम्ही श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाने प्रभावित आहोत असे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच या भूमीमध्ये आमची कंपनी असल्याने तिथे भेट देणे आमचे कर्तव्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

### निगडीत रंगणार मेघ मल्हार महोत्सव

**पिंपरी : दैनिक संध्या**

निगडी येथील नृत्यकला मंदिर संस्थेच्या वतीने १६ रोजी सायं साडे पाच वाजता ज्ञानप्रबोधिनी विद्यालयात गणेश महोत्सव अंतर्गत मेघ मल्हार संगीत महोत्सव आणि अश्विनी पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती गुरू तेजश्री अडिगे यांनी दिली. यावेळी संतूर वादक निनाद दैठणकर यांचे नृत्यांगना नुपूर दैठणकर यांची जुगलबंदी अनुभवता येणार आहे. नंदिनी व अंजली गायकवाड या भगिनींचे शास्त्रीय गायन होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात २०१० पासून सुरू झालेली 'मेघ मल्हार संगीत महोत्सवाची' परंपरा यंदाही कायम ठेवली आहे .बाल कलाकार व युवा कलाकारांना शास्त्रीय संगीत आणि नृत्याची प्रेरणा मिळावी, तसेच या कलांचा प्रचार आणि प्रसार व्हावा, यासाठी या महोत्सवाची सुरुवात संस्थेच्या संस्थापिका संचालिका तेजश्री अडिगे यांनी केली. या सोहळ्यात शास्त्रीय नृत्यामध्ये अविरत योगदान देणाऱ्या अभिनेत्री नुपूर दैठणकर यांना दिवंगत अभिनेत्री अश्विनी एकबोटे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा 'अश्विनी पुरस्काराने' सन्मानित केले जाणार आहे. यापूर्वी हा पुरस्कार शर्वरी जमिनीस, सुकन्या कुलकर्णी आणि उर्मिला कानेटकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार उमाताई खापरे उपस्थित राहणार आहेत.

### श्रावण संपताच पुणेकरांची मासळीला पसंती; पापलेट, सुरमई, रावसचे भाव तेजीत

**पुणे : दैनिक संध्या**

श्रावण संपल्यानंतर आणि गणेशोत्सवाच्या तोंडावर पुणेकरांनी मांसाहाराला पसंती दिली. शुक्रवार ते रविवार या तीन दिवसांत मटण, मासळी आणि चिकन खरेदीसाठी दुकानांमध्ये गर्दी झाली. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरून मासळीची मुबलक आवक होत असल्याने पापलेट आणि रावस वगळता अन्य मासळीचे दर स्थिर आहेत. पापलेट, सुरमई आणि रावसचे भाव मात्र तेजीत आहेत. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने मटणाच्या भावात किलोमागे ४० रुपयांची वाढ झाली. चिकनचा पुरवठा अधिक असल्याने भाव किलोमागे १० रुपयांनी घटल्याचे दिसून आले. तर, इंग्लिश अंड्यांच्या भावात शेकड्यामागे ४० रुपयांची वाढ झाली असून, गावरान अंड्यांचे भाव स्थिर आहेत. गणेश पेठ येथील घाऊक बाजारात रविवारी (दि. १३) खोल समुद्रातील मासळी २० ते २५ टन, खाडीच्या मासळीची ५०० किलो आणि नदीच्या मासळीची ५०० ते ७०० किलो इतकी आवक झाली. आंध्र प्रदेश येथून रहू, कतला आणि सिलनची मिळून २० ते २५ टन इतकी आवक झाली.




### गणेशोत्सवात ७०१ सराईत गुन्हेगारांना पुणे पोलिसांचा दणका

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पुणे पोलिसांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींविरोधात प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू केला आहे. परिमंडळ दोनच्या हद्दीतील विविध पोलिस ठाण्यांच्या अभिलेखावर असलेल्या ७०१ सराईत गुन्हेगारांना गणेशोत्सव काळात संबंधित पोलिस ठाण्याच्या हद्दीत प्रवेश आणि वास्तव्य करण्यास व गणेशोत्सवातील सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुकीत सहभागी होण्यासही त्यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे. गणेशोत्सवात प्रमुख रस्ते, चौक, मंडई परिसर, गणेश मंडळांचे परिसर तसेच विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर मोठी गर्दी होते. या गर्दीचा फायदा घेऊन अनुचित प्रकार घडू नयेत, तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. परिमंडळ दोनमध्ये स्वारगेट, सहकारनगर, पर्वती, मार्केट यार्ड, बिबवेवाडी, भारती विद्यापीठ आणि आंबेगाव या सात पोलिस ठाण्यांचा समावेश आहे. पर्वती पोलिस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक ११५ जणांवर कारवाई केली आहे. बिबवेवाडी आणि भारती विद्यापीठ प्रत्येकी १०४, सहकारनगर आणि आंबेगाव प्रत्येकी १०१, स्वारगेट १००, तर मार्केट यार्ड पोलिस ठाण्याच्या हद्दीत ७६ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. यामध्ये हत्यारांचा वापर, मारहाण, दुखापत, गंभीर दुखापत, धमकी, चोरी, दंगल, जबरी चोरी, दरोड्याची तयारी तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या विविध गुन्ह्यांमध्ये अभिलेखावर असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे.

# ताण-तणावात जगणे चिंताजनक बाब: इटकर

■ पिंपरी (दै. संध्या)

'विलर्न इंडिया'च्या वतीने 'रिमेम्बरिंग मी फाउंडेशन'च्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल एज्यूकेशन लीडरशिप समिटमध्ये शिक्षण क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या शहरातील महिला शिक्षकांना वुमन एज्युकेशनल लीडर्स पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. रावेत येथे आयोजित केलेल्या या शैक्षणिक परिषदेत ताण-तणाव व्यवस्थापनावर समुपदेशन करणाऱ्या "विलर्न इंडिया" ॲप आणि करियर कौन्सीलिंग, सोशल इमोशनल लर्निंग पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र इकोनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे उपाध्यक्ष सचिन इटकर, पिं-चिं एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई,मानसोपाचार तज्ञ डॉ. किशोर गुजर, पिं -चिं सायन्स पार्कचे संचालक प्रवीण तुपे, यारी ग्रुपचे अध्यक्ष ज्ञानेश्वर काळभोर, विलर्न इंडियाच्या संस्थापक / संचालिका रंजना पवार, संचालक सुधीर पाटील, संचालक भास्कर मर्गज, संचालक उमेश ढोणे आदी मान्यवर उपस्थित होते.




यावेळी श्री.इटकर म्हणाले कि, विलर्न' हे व्यासपीठ शिक्षकांना समुपदेशक बनण्याची एक उत्तम करिअरची संधी उपलब्ध आहे. दर सातपैकी एका किशोरवयीन मुलाला मानसिक समस्यांचा सामना करावा लागतो; नैराश्य, चिंता, मानसिक अस्वस्थता आणि मनस्थितीत होणारे बदल यांसारख्या समस्या या सामान्य आहेत. केवळ २% मुले आपल्या समस्यांबाबत शिक्षकांशी संवाद साधतात, तर जवळपास ७०% विद्यार्थी समुपदेशकांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. विलर्न इंडिया' व्यासपीठाद्वारे प्रत्येक शिक्षकाने प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. जर विद्यार्थ्यांना योग्य वयात समुपदेशन मिळाले, तर त्याचा देशाला समाजाला नक्कीच फायदा होईल. आज तरुणाई ताण तणावातून जात आहे. ही चिंताजनक बाब आहे.अशा परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी विलर्न हा ॲप नक्कीच उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

प्रा.देसाई म्हणाले कि,एआयच्या जगात अध्यापन पद्धतीत अमूलाग्र बदल घडून येत आहे. हे शिक्षण क्षेत्रासमोर मोठे आव्हान असणार आहे. शिक्षणाचे भविष्य घडवणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या पिढ्यांना प्रेरणा देणाऱ्या महिला शिक्षणतज्ज्ञांची दूरदृष्टी, त्यांच्यातील समर्पण वृत्ती आणि अग्रगण्य कार्याला वाहून घेणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करणे ही कौतुकास्पद बाब आहे.अशा शब्दांत विलर्न इंडियाचे कौतुक केले. डॉ.गुजर यांनी मुलांचे आणि प्रौढाचे मानसिक आरोग्याच्या समस्यांचे प्रतिबंध या विषयांवर मार्गदर्शन केले.

पुरस्कारार्थींमध्ये एसएनबीपी आंतरराष्ट्रीय शाळेच्या देवयानी भोसले,एएसएम इन्स्टिट्यूट ग्रुपच्या संचालिका डॉ.मणिमाला पुरी, अवसरा अकॅडमीच्या संचालक डॉ लक्ष्मी कुमार, पुणे केंब्रिजच्या विश्वस्त प्रीतम कुंजीर, ऑर्केड शाळेच्या डॉ.नम्रता माझाईल, सायन्स पार्कच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.श्रद्धा खाम्पारिया, मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्या घाडगे यांचा समावेश आहे.

"जनरेशन अल्फा आणि जनरेशन झेडसाठी मानसिक आरोग्य आणि नवीन युगातील करिअर - आव्हाने आणि संधी" या विषयावर आयोजित चर्चासत्रात देसाई फौंडेशनचे सीईओ प्रा.अश्विनीकुमार भारद्वाज, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सायकोलॉजी विभागप्रमुख प्रा. राजेंद्र म्हस्के,डॉ. व्यास मौर्य,मुक्तांगण व्यसनमुक्तीच्या सोनाली काळे हे सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युगांतर बल्लाळ तर आभार भास्कर मर्गज यांनी मानले. यावेळी सल्लागार सदस्य डॉ. स्वाती देशमुख, डॉ. सुभम जानकर, डॉ. खुशली ओझा, डॉ. रेखा कुमार, डॉ.माजू पुनिया, डॉ. शीतल सोलंकी यांचा सत्कार करण्यात आला.

## कुंजीरवाडी येथील धनश्री कार्यालयात मराठा समाजाची बैठक संपन्न

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील धनश्री कार्यालयात मराठा समाजाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर तसेच मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनासाठी मनोज दादा ज्यावेळी सांगतील त्यावेळी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने मुंबई येथे सहभागी होण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.



मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हवेली परिसरातील मराठा समाजबांधवांनी एकत्रितपणे भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले.

मनोज जरांगे पाटील यांनी सांगितल्यानंतर मुंबईकडे जाताना समाजबांधवांनी शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी व्हावे, प्रवासाचे नियोजन करावे तसेच आंदोलनादरम्यान शांतता व कायदा-सुव्यवस्था राखावी, याबाबतही बैठकीत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी मराठा समाजाचे सुनील शिंदे, अविनाश काळे, संदीप डुचे, प्रभाकर धुमाळ, अनिरुद्ध मराठे, सचिन सुंबे, निलेश सुंबे, सोमनाथ धुमाळ, बापूसाहेब घुले, सचिन माथेफोड, चंद्रकांत दुंडे, सुभाष कड, दिपक गोते, दिलीप आंबेकर, शुक्रराज काळे, भाऊसाहेब जाधव, राकेश ओझरकर, व बैठकीस कुंजीरवाडी व परिसरातील मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक १७ सप्टेंबर रोजी मनोज जरांगे पाटील हे पुणे - सोलापूर महामार्गाने काही निवडक कार्यकर्त्यांबरोबर मुंबईला जाणार असून त्यासाठी हडपसर येथे मुक्काम करणार आहेत. तसेच ज्यावेळी मनोज जरंगे पाटील हे कार्यकर्त्यांना मराठा समाजातील मुंबईला येण्यास सांगतील त्यावेळी जाताना यावेळी मुक्कामाच्या ठिकाणी कसलीही गडबड गोंधळ नको तसेच समाजातील लोकांची राहण्याची व खाण्याचे सोय करण्यासाठी या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी कुंजीरवाडी येथील धनश्री लॉन्स येथे राहण्याची व जेवण्याची मुख्य व्यवस्था करण्यात येणार असून पुणे- सोलापूर महामार्गावरील अनेक मंगल कार्यालय यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यावेळी मुंबईला जाणाऱ्या समाजबांधवांची संख्या, वाहन व्यवस्था, प्रवासाचे नियोजन, आवश्यक साहित्य तसेच विविध गावांतील समन्वय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी एकजुटीने आणि शांततेच्या मार्गाने आंदोलनाला पाठिंबा देण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी पोलीस प्रशासनाने धनश्री कार्यालयात भेट देऊन सर्व माहिती घेऊन नियोजनाबाबत चर्चा केली.

## वन राइड २०२६: स्नो लेपर्डसाठी राइड करण्याचे अंतिम आवाहन

■ पुणे (दै. संध्या)

२०११ पासून, वन राइडने विविध देश आणि खंडांमधील रायडर्सना एकाच दिवशी रायडिंगच्या साध्या आनंदात एकत्र आणले आहे. या वर्षी रॉयल एनफिल्ड आपल्या १२५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत ही राइड ६० देशांमध्ये १,६०० हून अधिक राइड्समध्ये आयोजित केली जाईल, जिथे मोटरसायकलिंगच्या सामायिक प्रेमाने आणि वर्ष २०२६ साठी या प्रवासांना शक्य करणाऱ्या ठिकाणांप्रती असलेल्या सामायिक जबाबदारीतून साकारलेली ही जागतिक एकत्रता असेल.




"प्रत्येक रायडर. प्रत्येक रस्ता. एक मिशन." (एव्हरी रायडर. एव्हरी रोड. वन मिशन.) या आवाहनांतर्गत वन राइड २०२६ उंच पर्वतरांगांमधील प्रमुख प्रजाती आणि या भूभागाचे चिरंतन प्रतीक असलेल्या हिमबिबट्याला (स्नो लेपर्ड) समर्पित आहे. हिमालय रॉयल एनफिल्डचे आध्यात्मिक घर मानले जाते, ज्याची अनेक पिढ्यांच्या रायडर्सनी भटकंती केली असून ते कंपनीच्या मोटरसायकल संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिले आहे. वन राइड २०२६ मध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रायडरमागे रॉयल एनफिल्ड हिमबिबट्यांच्या संवर्धनासाठी योगदान देईल, जिथे पर्वतांसोबतचे नाते हे त्यांच्या जतनाची जबाबदारीही सोबत आणते, याची कंपनीला पूर्ण जाणीव आहे.

हा उपक्रम रॉयल एनफिल्ड सोशल मिशनद्वारे आधीच सुरू असलेल्या संवर्धन कार्यावर आधारित आहे. कंपनीचे समुदाय संवर्धन प्रकल्प हिमाचल प्रदेश, लडाख, उत्तराखंड, सिक्कीम आणि जम्मू-काश्मीरमध्ये पसरलेले आहेत , जे हिमबिबट्यांच्या १०,५०० चौरस किमीपेक्षा जास्त अधिवासाला व्यापतात, त्यापैकी ५३ चौरस किमी क्षेत्र त्यांच्या समुदाय संवर्धन उपक्रमांतर्गत आणले गेले आहे. सध्या भारतात अंदाजे ७१८ हिमबिबटे आहेत. वन राइडच्या माध्यमातून हे अभियान जागतिक स्तरावर विस्तारत आहे, रायडर दिल्ली, लंडन किंवा साओ पाउलोमध्ये सहभागी असो, प्रत्येक रायडर थेट उत्तुंग हिमालयाशी जोडलेल्या संवर्धन प्रयत्नांना हातभार लावेल.

# किशोर आवारे खून खटल्यात साक्षीदारांवरील दबावाचे आरोप?

## ‘साक्ष बदलण्यासाठी’ धमकावल्याचा दावा; २० लाखांच्या व्यवहारापासून बंदुकीच्या धाकापर्यंत आरोप

■ पिंपरी (दै. संध्या)

तळेगाव दाभाडे येथील जनसेवा विकास समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांच्या खून खटल्यात साक्षीदारांवर दबाव आणला जात असल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत साक्षीदारांनी गोळीबाराची धमकी, साक्ष बदलण्यासाठी दबाव, मध्यरात्री घर गाठून धमकावणे तसेच पोलिस संरक्षण काढून घेतल्याचे आरोप केले. यावेळी किशोर आवारे यांच्या हत्येसाठी २० लाख रुपयांचा व्यवहार झाल्याचा दावाही करण्यात आला.




किशोर आवारे यांची १२ मे २०२३ रोजी तळेगाव नगरपरिषदेसमोर गोळ्या झाडून हत्या झाली होती. या प्रकरणाचा सत्र खटला क्रमांक ५४/२०२३ वडगाव मावळ येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात सुरू आहे. तपासादरम्यान गोळा करण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक पुरावे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब खटल्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व महत्त्वाच्या साक्षीदारांना सातत्याने पोलिस संरक्षण देण्याची मागणी पत्रकार परिषदेत करण्यात आली.

प्रकरणातील साक्षीदार मोहसीन मुलाणी यांनी किशोर आवारे यांच्या हत्येपूर्वी कटाची माहिती मिळाल्याचा तसेच त्याबाबत आवारे यांना सावध केल्याचा दावा केला आहे. पत्रकार परिषदेत करण्यात आलेल्या आरोपानुसार, सुधाकर शेळके यांनी आपल्या समोर किशोर आवारे यांना मारण्यासाठी २० लाख रुपये दिल्याचा दावा मोहसीन मुलाणी यांनी केला. त्यानंतर आपला जबाब बदलण्यासाठी आपल्यावर दबाव आणण्यात आल्याचेही त्यांनी सांगितल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

आकाश जगताप हे या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून, घटनेच्या वेळी त्यांनी मोबाईलमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग केल्याचा दावा करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेत करण्यात आलेल्या आरोपानुसार, संदीप गराडे यांनी आकाश जगताप यांना बोलावून त्यांच्या डोक्याला बंदूक लावली आणि साक्ष देऊ नये, अशी धमकी दिली. उलटतपासणीदरम्यान आपल्यावर साक्ष देऊ नये म्हणून दबाव आणण्यात आला तसेच बंदुकीचा धाक दाखविण्यात आल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितल्याचा उल्लेख प्रसिद्धीपत्रकात आहे.

अनिल पवार यांनी आपले पोलिस संरक्षण काढून घेण्यात आल्याचा आरोप केला. तसेच राजकीय पदाचा गैरवापर करून आपल्यावर मोक्का (MCOCA) कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. याशिवाय संदीप गराडे यांनी फोन करून ‘आमदार, मंत्री होईल, कशाला वादात जाता…’ अशा आशयाचे बोलून धमकावल्याचा आरोप पवार यांनी पत्रकार परिषदेत केला.

अनिल पवार यांच्यावर यापूर्वी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई झाली होती. विशेष सत्र न्यायालयाने जामीन मंजूर करताना या कारवाईबाबत निरीक्षण नोंदविल्याचा दावा पत्रकार परिषदेत करण्यात आला.

दत्तात्रय पारगे यांनीही साक्ष बदलण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप केल्याचे सांगण्यात आले. जानेवारी २०२६मध्ये काही व्यक्तींनी आपल्याला एका ठिकाणी नेऊन खोटी साक्ष देण्यासाठी दबाव आणला, तसेच ३० मार्च रोजी मध्यरात्री घर गाठून धमकी दिल्याचा दावा त्यांनी केल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. त्यानंतर काही साक्षीदारांना चोवीस तास पोलिस संरक्षण देण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

मिलिंद अच्युत यांनीही आपल्याला धमकी मिळाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्याचा दावा करण्यात आला. त्यानंतर त्यांना पोलिस संरक्षण देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, पत्रकार परिषदेत साक्षीदारांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणण्यात आला. साक्षीदारांना धमक्या देणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, महत्त्वाच्या साक्षीदारांना सातत्याने पोलिस संरक्षण द्यावे आणि त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली.

पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेस आकाश जगताप, मोहसीन मुलाणी, अनिल पवार, मिलिंद अच्युत, दत्ता पारगे, निलेश पारगे, सुनिल करंडे आदी उपस्थित होते.

या प्रकरणातील २० लाख रुपयांच्या व्यवहाराचा दावा, धमक्यांचे आरोप, पोलिस संरक्षण काढून घेतल्याचा आरोप तसेच मोक्का कारवाईबाबत करण्यात आलेले दावे हे संबंधित व्यक्तींनी केलेले आरोप आहेत. या आरोपांची स्वतंत्र न्यायालयीन पडताळणी होणे बाकी असून, संबंधित व्यक्तींची बाजू आणि न्यायालयीन निष्कर्ष अद्याप समोर आलेले नाहीत.

या प्रकरणाची उच्च न्यायालयातील पुढील सुनावणी २४ सप्टेंबर २०२६ रोजी, तर वडगाव मावळ येथील सत्र न्यायालयातील पुढील सुनावणी १ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र वाटप

■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र आज राज्याचे माजी राज्य मंत्री आ. डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते काँग्रेस भवन येथे झालेल्या कार्यक्रमात समारंभपूर्वक देण्यात आले. तसेच यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वेबसाईटचे (punecongress.in) (deeptichawadhray.in) उद्घाटनही यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी, पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, महाराष्ट्राचे माजी गृहराज्य मंत्री रमेश बागवे, माजी आमदार उल्हास पवार, पुणे मनपा गटनेते चंदूशेठ कदम, प्रदेश पदाधिकारी अमिर शेख, हनुमंत पवार, भाऊसाहेब आजबे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी मा. आ. डॉ. विश्वजीत कदम म्हणाले की, "देशात विविध प्रश्नांबाबत विद्यार्थी आणि युवकांची आंदोलने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या देशात चालू आहेत. केंद्रातील मोदी सरकारचा अनागोंदी आणि अकार्यक्षक कारभार, असह्य झालेली महागाई, शिक्षण व्यवस्थेचा उडालेला बोजबारा आणि नोकरी व रोजगाराविना विना फिरणारे युवकांचे तांडे हे साऱ्या देशाची विदारक परिस्थिती आहे. मात्र देशातील जेंझी आणि तरूण आता पेटून उठला असून पुण्यात झालेल्या काँग्रेस नेते खा. राहुलजी गांधींच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमामुळे देशातील युवक - युवतींना दिशा व उमेद मिळाली आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी देखील आपापल्या भागात युवा शक्तीला अधिक संघटित करण्यावर भर दिला पाहिजे आणि काँग्रेसचा कार्यकर्ता हा जनतेच्या हितासाठी रस्त्यावर दिसला पाहिजे."

यानंतर पुणे शहर काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दिप्ती चवधरी म्हणाल्या की, "मला अध्यक्ष होवून १०० दिवस झाले असून या १०० दिवसांचा कार्यअहवाल मी खा. राहुलजी गांधी यांना नाशिक येथे झालेल्या शिबीरामध्ये दिला आहे. पुण्यातील काँगेस पक्ष हा परिवर्तनाचे चक्र कायम राखत आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा खासदार व आमदार असेल तसेच पुणे महानगरपालिकेवर काँग्रेसचा झेंडा फडकवेल तील अशी खात्री देते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करून पक्षाला बळगटी द्यावी."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक सुनिल शिंदे यांनी केले तर आभार राजेंद्र भुतडा यांनी मानले.

## 'दगडूशेठ' चे प्रेम मंदिरात विराजमान

■ पुणे (दै. संध्या)

गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया... च्या जयघोषात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरापासून फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून निघालेल्या दिमाखदार आगमन मिरवणुकीने वाजत गाजत वृंदावन मधील प्रेम मंदिराच्या जय गणेश प्रांगण येथे साकारलेल्या प्रतिकृतीमध्ये 'दगडूशेठ' चे गणपती बाप्पा विराजमान झाले. श्रीं चा हा नयनरम्य आगमन सोहळा पाहण्याकरता हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षानिमित्त आयोजित उत्सवाचा प्रारंभ हजारो भक्तांच्या साक्षीने झाला. गणेश चतुर्थीला सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे उत्तरप्रदेश वृंदावन येथील श्री राधावल्लभ मंदिराचे १८ वे तिलकायत अधिकारी श्रीहित मोहितमराल गोस्वामीजी महाराज यांच्या हस्ते श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना झाली.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, विश्वस्त रोहित लोंढे, पराग वांबुरे, राजेंद्र गावडे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सकाळी ८.३० वाजता मुख्य मंदिरापासून फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गंधाक्ष ढोल ताशा पथक, मयूर बँड, प्रभात बँड आणि दरबार बँड मिरवणुकीत सहभागी झाले होते. मुख्य मंदिर, अप्पा बळवंत चौक, शनिपार चौक, टिळक पुतळा मंडईमार्गे उत्सव मंडपात मिरवणूक आली.

मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर रोजी पहाटे ६ वाजता ऋषिपंचमीनिमित्त दरवर्षीप्रमाणे ३५ हजार महिला सामुदायिकरीत्या अर्थवशीर्ष पठण करणार आहेत. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल तेली- उगले उपस्थित राहणार आहेत. तसेच रात्री १० ते १२ वाजेपर्यंत हरी जागर च्या माध्यमातून महाराष्ट्रातील वारकरी बंधू वारकरी गजर करीत गणरायाचरणी सेवा अर्पण करणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




### 'मंडई' च्या शारदा गजाननाचे भव्य पुष्परथातून आगमन

पुणे : दैनिक संध्या

गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने दुमदुमलेला मंडई परिसर, ढोल-ताशांच्या निनादाने भारावलेले वातावरण आणि फुलांनी सजविलेल्या भव्य पुष्परथातून झालेले शारदा गजाननाचे आगमन... अशा भक्तिमय वातावरणात पुण्याचे वैभव असलेल्या अखिल मंडई मंडळाच्या शारदा गजाननाचे उत्सव मंडपात आगमन झाले. मंडळाच्या गणेशोत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष असून, आगमनानंतर दुपारी १२ वाजता डॉ. विनय थोरात आणि प्रतिभा थोरात यांच्या हस्ते हरिहर मंदिरात श्रींची प्राणप्रतिष्ठापना झाली. यावेळी डॉ. पराग काळकर, डॉ. सतीश देसाई, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, अ‍ॅड. प्रताप परदेशी, जयंत किराड, संजय मते, अभय थोरात, मिलिंद काची, सचिव विश्वास भोर, सुरज थोरात यावेळी उपस्थित होते. अखिल मंडई मंडळ ते मंडई पोलीस चौकी, रामेश्वर चौक, गोटीराम भैया चौक, मेट्रो स्टेशन मार्गे उत्सव मंडप असा आगमन मिरवणुकीचा मार्ग होता. मिरवणुकीत समर्थ आणि तालचक्र ढोलपथकांसह न्यू गंधर्व बँड सहभागी झाले होते. मिरवणुकीच्या अग्रभागी न्यू गंधर्व बँड पथक आणि वाद्यपथके होती.




### आगाखान पॅलेस उजळला 'आशेच्या सोनेरी प्रकाशाने'; बाल कर्करोग जनजागृतीचा संदेश

पुणे : दैनिक संध्या

इतिहासाची साक्ष देणारा आगाखान पॅलेस आज एका वेगळ्याच कारणासाठी उजळून निघाला. बाल कर्करोगाशी झुंज देणाऱ्या छोट्या योद्ध्यांच्या धैर्याला सलाम करण्यासाठी अ‍ॅक्सेस लाइफ असिस्टन्स फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या बाल कर्करोग जागृती महिन्याच्या विशेष कार्यक्रमात संपूर्ण परिसर सोनेरी प्रकाशाने न्हाऊन निघाला. हातात मेणबत्त्या घेऊन उभ्या असलेल्या कर्करोगग्रस्त मुलांनी आणि त्यांच्या पालकांनी "आशा जिवंत ठेवा, लढा सुरू ठेवा" हा संदेश संपूर्ण पुण्यापर्यंत पोहोचवला. या उपक्रमाचा उद्देश केवळ बाल कर्करोगाबाबत जनजागृती करणे नव्हता, तर उपचाराच्या कठीण प्रवासात असलेल्या प्रत्येक मुलाला आणि त्यांच्या कुटुंबाला समाजाच्या प्रेमाचा व आधाराचा हात देणे हाही होता. शहरी, ग्रामीण आणि दुर्गम भागातून उपचारासाठी शहरात येणाऱ्या वंचित कर्करोगग्रस्त बालकांना अ‍ॅक्सेस लाइफ असिस्टन्स फाउंडेशनकडून पूर्णपणे विनामूल्य निवास, पौष्टिक आहार, रुग्णालयीन उपचारांसाठी मदत, प्रवास सुविधा, अनौपचारिक शिक्षण, समुपदेशन आणि मानसिक आधार उपलब्ध करून दिला जातो, अशी माहिती पुणे केंद्र व्यवस्थापक डॉ. चंदन धर्मराज यांनी दिली. "कर्करोगाशी लढणाऱ्या कोणत्याही वंचित मुलाला ही लढाई एकट्याने लढावी लागू नये," या ध्येयाने २०१४ मध्ये अ‍ॅक्सेस लाइफ असिस्टन्स फाउंडेशनची स्थापना झाली. आज भारतातील १४ केंद्रांमधून हजारो कुटुंबांना उपचाराच्या काळात सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आधार दिला जात आहे. या कार्यक्रमास फाउंडेशनचे संस्थापक अंकित दवे, गिरीश नायर, विशू, पुणे केंद्र व्यवस्थापक डॉ. चंदन धर्मराज, फाउंडेशनचे पदाधिकारी, कर्मचारी, कर्करोगग्रस्त मुले, त्यांचे पालक आणि असंख्य हितचिंतक उपस्थित होते.

## गणेशोत्सवात स्पीकरच्या भिंती नव्हे, गरजूंसाठी धान्याच्या भिंती उभारण्याचा आदर्श

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव म्हटला की मोठ्या आवाजातील स्पीकर, ध्वनिप्रदूषण आणि विसर्जन मिरवणुकीतील चर्चा होत असताना, शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळाने उत्सवाला सामाजिक बांधिलकीची दिशा देत गरजू व निराधार कुटुंबांसाठी धान्याच्या भिंती उभारण्याचा आदर्श निर्माण केला आहे. उत्सवातील शक्ती केवळ जल्लोषासाठी न वापरता ती समाजाच्या उपयोगी यावी, या भावनेतून मंडळाच्या वतीने एक लाख रुपयांच्या किराणा साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. वर्षभर विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला काही तरी देण्याचा प्रयत्न मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून केला जातो.



शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळात येथे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार हेमंत रासने, नगरसेवक राघवेंद्र मानकर, सौरभ वीरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय पिंगळे, गणेश अवघडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, उमेश कांबळे, अशोक मेहेंदळे, शिरीष शिंदे, किरण सोनीवाल, अमित जाधव, अनिकेत मारणे,सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ महाडिक, शिरीष मोहिते, अमर लांडे, नमन कांबळे, विक्रांत मोहिते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हेमंत रासने म्हणाले, सेवा मित्र मंडळाने स्पीकरच्या भिंतींऐवजी गरजू कुटुंबांसाठी धान्याच्या भिंती उभारून समाजाप्रती असलेली बांधिलकी जपली आहे. गरजूंसाठी अशा पद्धतीने मदतीचा हात पुढे करणे हे मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे. ३६५ दिवस समाजाला काही तरी देणे लागतो, या भावनेने काम करणारे कार्यकर्ते हीच गणेशोत्सवाची खरी ताकद आहे. १३४ वर्षांची परंपरा असलेल्या या उत्सवाने अनेक समर्पित कार्यकर्ते घडविले असून, उत्सवाला दिशा देण्याचे काम त्यांनी केले आहे. एक दिवसाच्या विसर्जन मिरवणुकीमुळे वर्षभर हा उत्सव समाजाला कशा प्रकारे मदत करतो हे विसरता कामा नये. विसर्जन मिरवणुकीसह उत्सवातील सर्व उपक्रमांमध्ये कायद्याचे पालन केले पाहिजे. गणेशोत्सव ही केवळ उत्सवाची परंपरा नसून एक चळवळ आहे आणि या चळवळीने संघटित शक्ती निर्माण केली आहे. या शक्तीचा उपयोग समाजासाठी करण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची आहे.

सौरभ वीरकर म्हणाले, सेवा मित्र मंडळाकडून उत्सवाच्या माध्यमातून सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. गरजू आणि निराधार कुटुंबांना मदतीचा हात देत मंडळाने गणेशोत्सवाच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. वर्षभर अशा पद्धतीने काम करणाऱ्या मंडळाचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.

शिरीष मोहिते म्हणाले, सण-उत्सव साजरे करताना समाजातील उपेक्षित घटकांकडे मंडळाच्या वतीने आवर्जून लक्ष दिले जाते. उत्सव ताकदीने साजरा व्हावा, मात्र त्याचबरोबर त्यातून समाजोपयोगी संदेशही गेला पाहिजे. समाजातील गरजू कुटुंबांनाही सण आनंदाने साजरा करता यावा, हा या उपक्रमामागचा उद्देश आहे. गणेशोत्सव हा कोण्या एका धर्माचा उत्सव नसून त्यात मुस्लिम समाजासह विविध समाजघटकांचेही योगदान राहिले आहे. त्यामुळे हा उत्सव समाजाला जोडणारा आणि एकमेकांना आधार देणारा ठरला पाहिजे.

मंडळाच्या वतीने पुरुष सदस्य नसलेल्या तसेच निराधार कुटुंबांना या उपक्रमातून मदत करण्यात येत आहे. यामध्ये मुस्लिम कुटुंबांसह रोजगारासाठी पुण्यात आलेल्या नेपाळी कुटुंबांचाही समावेश आहे. धर्म, जात किंवा प्रांताचा विचार न करता गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.

## टाटा प्लेकडून आयकॉनिक बिग बॉस सीझन्सच्या विनाव्यत्यय मनोरंजनासाठी रिॲलिटी टीव्ही चॅनेल लाँच

■ पुणे (दै. संध्या)

टाटा प्लेने आज टाटा प्ले रिॲलिटी टीव्हीच्या लाँचची घोषणा केली. ही एक २४x७ जाहिरातमुक्त समर्पित सेवा आहे, जी हिंदी रिॲलिटी टेलिव्हिजनवरील काही अत्यंत लोकप्रिय आणि सर्वाधिक चर्चिले गेलेले क्षण एकत्र आणते. अनस्क्रिप्टेड रिॲलिटी कन्टेन्ट प्रेक्षकांमध्ये सातत्याने पसंतीस उतरत असून त्याची लोकप्रियता कायम आहे. ज्यामुळे प्रेक्षकांना अधिक वैविध्यपूर्ण कन्टेन्ट, फॉरमॅट्स आणि पाहण्याचा अनुभव देण्यासाठी टाटा प्ले आपल्या मनोरंजन ऑफरिंगचा विस्तार करत आहे.

शेमारू एंटरटेनमेंटसोबत सहयोगाने सुरू करण्यात आलेली ही सेवा बिग बॉसच्या दोन महत्त्वपूर्ण सीझन्ससह पदार्पण करेल आणि काळानुरूप हळूहळू आपल्या कार्यक्रमांच्या यादीचा विस्तार करेल. टाटा प्ले रिॲलिटी टीव्ही प्रेक्षकांसाठी रिॲलिटी टेलिव्हिजनमधील काही सर्वात संस्मरणीय व्यक्तिमत्त्वे, स्पर्धा, मैत्री, भावनिक प्रवास आणि मूळ प्रसारणाच्या बराच काळानंतरही चर्चेत राहिलेल्या सांस्कृतिक क्षणांचे निवडक व्यासपीठ उपलब्ध करून देईल.

पहिल्या सीझन १ ने भारतातील सर्वात यशस्वी रिॲलिटी फ्रँचायझीची सुरुवात केली,ज्याने सतत देखरेखीखाली सेलिब्रिटी एकत्र राहण्याची तत्कालीन नवी संकल्पना प्रेक्षकांना पहिल्यांदाच दाखवली. अरशद वारसी सूत्रसंचालक असलेल्या आणि राहुल रॉय विजेते ठरलेल्या या सीझनमध्ये राहुल रॉय, रवी किशन आणि राखी सावंत यांसारखे उल्लेखनीय स्पर्धक होते, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वांनी आणि संवादांनी या शोच्या सुरुवातीच्या संस्मरणीय क्षणांमध्ये योगदान दिले.

यासोबत, सलमान खान सूत्रसंचालक असलेला आणि शिल्पा शिंदे विजेती ठरलेला अत्यंत लोकप्रिय सीझन ११ समाविष्ट आहे. दमदार व्यक्तिमत्त्वे, तीव्र स्पर्धा, भावनिक क्षण आणि अत्यंत रंजक टास्क-आधारित खेळासाठी ओळखल्या गेलेल्या या सीझनमध्ये शिल्पा शिंदे आणि हिना खान यांसारखे स्पर्धक होते, ज्यांच्या प्रवासाने आणि पडद्यावरील समीकरणांनी याला शोच्या इतिहासातील सर्वाधिक चर्चिला गेलेला टप्पा बनवले आणि देशभरातील प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता व चर्चा निर्माण केली.

## यंदाचा पुणे विद्यापीठाचा 'जल्लोष' युवा महोत्सव शारदानगरला

■ पुणे (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या (SPPU) विद्यार्थी कल्याण मंडळ व सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित केला जाणारा वार्षिक सांस्कृतिक युवक महोत्सव 'जल्लोष' येत्या शनिवार, दिनांक- 3 ऑक्टोबर 2026,रोजी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे,शारदाबाई पवार महिला आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज शारदानगर माळेगाव बु।। ता. बारामती जि. पुणे येथे संपन्न होत आहे. विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या या महोत्सवाचे आयोजन ग्रामीण भागातील महाविद्यालयात करण्यात आले असून, यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे विविध प्रकार पाहायला मिळणार आहेत. या कार्यक्रमात पारंपारिक लोककला, आधुनिक नृत्य, संगीत, नाट्यप्रयोग, कविता सादरीकरण आणि वादविवाद अशा अनेक कलाप्रकारांचा समावेश असेल.

या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुण ओळखणे आणि त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लागणार असून, महाविद्यालयात सांस्कृतिक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार देशमुख यांनी सांगितले की या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या सचिव व विश्वस्त आदरणीय सौ. सुनंदा पवार व संस्थेचे चेअरमन मा. राजेंद्र दादा पवार तसेच विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रतिनिधी आणि स्थानिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## कुचिपुडीच्या विविध पैलूंचा अभूतपूर्व रंगमंचीय कलाविष्कार

■ पुणे (दै. संध्या)

गणेश कौत्वममधून मंगलाचरण, स्वामी रा रा या शब्दममधून भगवान कृष्णाचे भावपूर्ण चित्रण आणि मरकत मणिमय चेला या तरंगमधून ताल, लय व संतुलनाचा प्रत्यय देत सयुजा मुजुमदार हिने आपल्या नृत्यसाधनेचा कलात्मक आविष्कार रंगमंचावर घडवला. नृत्त, भावाभिनय आणि नाट्यमयतेचा सुरेख मिलाफ साधत सादर केलेल्या या रंगप्रवेशमध्ये पितळी ताटाच्या कडांवर केलेल्या तरंगमधील तालबद्ध हालचाली आणि संतुलनाने रसिकांचे लक्ष वेधले.

समार्चना स्कूल ऑफ डान्स यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यास प्रमुख अतिथी नृत्य चूडामणी वैजयंती काशी, प्रमुख पाहुण्या नृत्य निपुण प्रतीक्षा काशी, सयुजाच्या गुरू आणि आई नमिता मुजुमदार, गुरु वैभव आरेकर यांच्यासह नृत्य क्षेत्रातील मान्यवर, गुरू, शिक्षक, कुटुंबीय आणि रसिक उपस्थित होते. या रंगप्रवेशनिमित्त सयुजाला आरिया विद्यापीठाकडून मान्यतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राग आरभि आणि आदि तालातील गणेश कौत्वमने झाली. भगवान गणेशाला वंदन करणाऱ्या या मंगलाचरणातून सयुजाने नृत्याच्या माध्यमातून गणेशाचे रूप उलगडले. त्यानंतर राग मोहन आणि आदि तालातील स्वामी रा रा या शब्दम मध्ये भगवान कृष्णाचे सौंदर्य, मोहक व्यक्तिमत्त्व आणि दैवी गुण भावाभिनयातून साकारले. स्वर, ताल आणि अभिनयाचा सुरेख मेळ या सादरीकरणातून साधण्यात आला.



यानंतर भरतनाट्यम आणि कुचिपुडीमधील हालचालींच्या शैलीतील फरक प्रात्यक्षिकातून स्पष्ट करण्यात आला. समार्चना स्कूल ऑफ डान्सच्या विद्यार्थिनी मल्लिका आणि देविका राजवाडे यांनी अरैमंडीच्या माध्यमातून दोन्ही नृत्यप्रकारांतील शरीराची बैठक, हालचाली आणि प्रवाहीपणातील फरक दाखवून दिला. त्यानंतर मरकत मणिमय चेला या तरंगमध्ये सयुजाने कृष्णाचे रूप आणि गुण अभिनयातून साकारत तालबद्ध नृत्य केले. पितळी ताटाच्या कडांवर संतुलन राखत केलेल्या या सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

सयुजाने वयाच्या पाचव्या वर्षी नृत्याचे प्रशिक्षण सुरू केले. भरतनाट्यम आणि कुचिपुडीसोबत योगासने, बॅले आणि समकालीन नृत्याचाही तिने अभ्यास केला आहे. कुचिपुडीचे प्राथमिक प्रशिक्षण नमिता मुजुमदार यांच्याकडून घेतल्यानंतर नृत्य चूडामणी वैजयंती काशी यांच्या मार्गदर्शनाखाली तिच्या प्रशिक्षणाला अधिक व्यापक दिशा मिळाली. बंगळुरू येथील अटक्कलरी सेंटर फॉर मूव्हमेंट आर्ट्स येथे तिने समकालीन नृत्यात डिप्लोमा पूर्ण केला असून, इतिहास, पुरातत्त्वशास्त्र आणि कुचिपुडीतील अभ्यासही ती करत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नीरेत बाप्पाचे उत्साहात स्वागत; गणपती बाप्पाला घरी नेण्यासाठी नीरा पेठेत गर्दी

**नीरा : दैनिक संध्या**

नीरा (ता. पुरंदर) व पंचक्रोषीत गणरायाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने गुलालाची उधळण करीत तर काही मंडळींनी फुले उधळून गणरायाचे स्वागत केले. ढोल ताशांच्या गजरात, बॅंडच्या तालावर नाचत "गणपती बाप्पा मोरया" म्हणत आज सोमवारी गणपतीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. आज सकाळपासूनच तरुणांनी नीरा बाजारपेठेत मोठी गर्दी केली होती. नीरा पंचक्रोशीतील भाविकांनी नीरेतील पेठेतून तसेच कुंभारवाड्यातुन गणेशमुर्ती आपल्या घरी नेण्यासाठी गर्दी केली होती. घरगुती गणेशाची स्थापना सकाळी लवकर मुहुर्त असल्याने लवकरच करण्यात आली. दुपारी चार नंतर विविध मंडळानी गणेशाचे पारंपरिक वाद्य आणि बॅंडच्या तालावर नाचत स्वागत करीत स्थापना केली. नीरेतील प्रमुख शिवाजी तरुण मंडळ, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ वार्ड नं तीन, बुवासाहेब तरुण मंडळ, जयभवानी जिवनदीप तरुण मंडळ, कानिफनाथ तरुण मंडळ, अमरदिप जिवनदिप मंडळ, शिवगणेश मंडळ, अष्टविनायक मंडळ, त्रिमूर्ती मंडळ, शिवशंकर गणेशोत्सव मंडळ आदी मंडळांनी संध्याकाळी उशीरा मुर्तीची प्राण प्रतिष्ठापना केली.

### पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतींने गणेशोत्सव साजरा करा - मुख्यमंत्री

**मुंबई : दैनिक संध्या**

परंपरेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण यांचा समतोल साधणे ही सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाचा आनंद घेताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. पारंपरिक पद्धतींचा आदर राखत पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गणेश चतुर्थीच्या मंगलमय मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांचे मुंबईतील अधिकृत निवासस्थान ‘वर्षा’ येथे श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने बाप्पाची पूजा-अर्चा करून आरती केली. श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील तसेच देशभरातील गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विघ्नहर्त्याने सर्वांच्या जीवनात आनंद आणून सर्व विघ्ने दूर करावीत. देश, राज्य, नागरिक आणि बळीराजासमोरील अडचणी दूर होऊन सर्वांना नवचैतन्य, सामर्थ्य आणि समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, आनंद आणि परंपरेचा उत्सव आहे. सर्व गणेशभक्तांनी हा उत्सव आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा करावा. मात्र, गणेशोत्सवाच्या उत्साहाबरोबरच पर्यावरणाचे भान राखण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.



# केविनकेअर आणि MMA यांनी चिनीकृष्णन इनोव्हेशन अवॉर्ड्समध्ये नवोन्मेषकांचा गौरव केला

■ मुंबई (दै. संध्या)

केविनकेअरने मद्रास मॅनेजमेंट असोसिएशनच्या (MMA) सहकार्याने भारतातील आशादायी नवोन्मेषक आणि उदयोन्मुख कल्पनाकारांचा 15व्या चिनीकृष्णन इनोव्हेशन अवॉर्ड्स 2026 मध्ये गौरव केला. हा पुरस्कार सोहळा चेन्नई येथील आयआयटी मद्रास रिसर्च पार्क ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला व्होल्वो ग्रुप इंडियाचे प्रेसिडेंट आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कमल बाली प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि प्रतिष्ठित व्यक्तीही उपस्थित होत्या.



यावर्षी पुरस्कारांमध्ये ‘ग्रेट आयडियाज’ या श्रेणीतील 10 प्रवेशिकांचाही गौरव करण्यात आला. त्यामुळे ग्रेट आयडियाज आणि इनोव्हेशनसाठी देशातील प्रतिष्ठित पुरस्कारांपैकी एक म्हणून या पुरस्काराचे स्थान आणखी मजबूत झाले आहे. या श्रेणीमध्ये प्रारंभिक टप्प्यातील आशादायी कल्पनांना त्यांची मौलिकता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि प्रासंगिकता याआधारे मान्यता देण्यात आली.

या प्रसंगी बोलताना केविनकेअरचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर सी. के. रंगनाथन म्हणाले, “गेल्या 15 वर्षांतील चिनीकृष्णन इनोव्हेशन अवॉर्ड्सचा प्रवास पाहता, इनोव्हेशन हे प्रगतीच्या केंद्रस्थानी आहे आणि ते अनेक वेगवेगळ्या स्वरूपात समोर येऊ शकते, हा आमचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.

“गेल्या अनेक वर्षांपासून या पुरस्कारांनी नाविन्यपूर्ण कल्पना ओळखण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तसेच अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्याची क्षमता असलेल्या उद्योजकांना पाठबळ दिले आहे. यावर्षी ‘ग्रेट आयडियाज’ श्रेणीचा पुन्हा समावेश करणे हा याच प्रयत्नांना आणखी बळ देणारा उपक्रम आहे.

“15 वर्षांचा हा प्रवास पूर्ण करताना आम्हाला अभिमान आहे की, चिनीकृष्णन इनोव्हेशन अवॉर्ड्स आजही इनोव्हेशनला प्रोत्साहन देणे, उद्योजकीय प्रतिभेला विकसित करणे आणि सक्षम इकोसिस्टम निर्माण करण्याच्या दिशेने कार्यरत आहेत.”

मद्रास मॅनेजमेंट असोसिएशनचे प्रेसिडेंट ए. आर. उन्नीकृष्णन यांनीही आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, “MMA ला अभिमान आहे की आम्ही एका दशकाहून अधिक काळ केविनकेअर चिनीकृष्णन इनोव्हेशन अवॉर्ड्ससोबत भागीदारी करत आहोत आणि राष्ट्रीय स्तरावर इनोव्हेशन तसेच सर्वसमावेशकतेचा गौरव करत आहोत. यावर्षी प्राप्त झालेल्या 850 हून अधिक नामांकनांमधून भारतातील इनोव्हेशन इकोसिस्टमची वेगाने होत असलेली वाढ अधोरेखित होते. “हे पुरस्कार आपल्या अर्थव्यवस्थेला पुढे नेणाऱ्या उद्योजकीय भावनेचा गौरव करतात आणि अधिक समृद्ध व सर्वसमावेशक भविष्याच्या दिशेने मार्ग प्रशस्त करतात.”

इनोव्हेशन श्रेणीतील प्रवेशिकांचे मूल्यमापन राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित ज्युरीने युनिकनेस, समस्या सोडविण्याची क्षमता, व्यवहार्यता, विस्तारक्षमता (स्केलेबिलिटी), सामाजिक प्रभाव आणि शाश्वतता (सस्टेनेबिलिटी) या निकषांवर केले. तर ग्रेट आयडियाज श्रेणीतील प्रवेशिकांचे मूल्यमापन त्यांची मौलिकता, समस्येची प्रासंगिकता आणि भविष्यात अर्थपूर्ण समाधानामध्ये विकसित होण्याची क्षमता या आधारावर करण्यात आले.

## सणासुदीच्या काळात केसांना द्या खास ग्लो; RAISE by Jean Claude Biguine घेऊन आले संपूर्ण हेअर केअर रिच्युअल

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

मुंबई, ऑगस्ट २०२६: सणासुदीचा काळ म्हणजे नटणे, सजणे आणि आपल्या लूकमधून स्टाइल स्टेटमेंट करणे. त्वचा आणि कपड्यांप्रमाणेच केसांनाही या काळात विशेष काळजीची गरज असते. सततचे हीट स्टायलिंग, दमट वातावरण, वारंवार केस धुणे आणि उन्हात जास्त वेळ राहणे यामुळे केस कोरडे, फ्रिझी आणि कमकुवत होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर RAISE by Jean Claude Biguineने सणासुदीच्या काळासाठी प्री-वॉश, वॉश आणि पोस्ट-वॉश अशा तीन टप्प्यांमध्ये संपूर्ण हेअर केअर रिच्युअल सादर केले आहे.




प्री-वॉश केअरची सुरुवात RAISE Fall Fighter Pre-Wash Scalp Oil (४८ मिली, किंमत ₹२,४९९) पासून करता येते. डबलिंग टेक्नॉलॉजीसह तयार करण्यात आलेले हे स्कॅल्प ऑइल नैसर्गिक तेलांच्या आठ प्रकारांच्या मिश्रणासह Ceramide NPचा वापर करते. Rosemary Extract स्कॅल्पला पोषण देण्यास मदत करते, तर Hemisqualane केसांची लवचिकता आणि मजबुती वाढविण्यास सहाय्य करते. ब्रँडच्या चाचण्यांनुसार, हे उत्पादन केस तुटणे ९७% आणि केसगळती ९३% पर्यंत कमी करण्यास मदत करते.

यानंतर RAISE Fall Fighter Scalp Exfoliator (₹१,४९९) चा वापर करता येतो. ४०.५% Solar Sea Salt असलेले हे प्री-क्लिन्झ ट्रीटमेंट स्कॅल्पवरील अतिरिक्त तेल आणि बिल्ड-अप दूर करून केसांच्या मुळांना स्वच्छ ठेवण्यास मदत करते. ब्रँडच्या चाचण्यांमध्ये ९९.९% परीक्षकांनी स्कॅल्प अधिक स्वच्छ आणि तेलमुक्त वाटल्याचे नमूद केले आहे.

वॉशच्या टप्प्यात RAISE Fall Fighter Shampoo (₹२,०९९) केसगळती कमी करण्यास, फॉलिकल्सला उत्तेजित करण्यास आणि मुळांना व्हॉल्यूम देण्यास मदत करते. त्यानंतर *RAISE On Cloud 9 Hair Mask (₹२,४९९)*चा वापर करून कोरड्या आणि फ्रिझी केसांना हायड्रेशन, मऊपणा आणि ग्लाससारखी चमक मिळवता येते.

पोस्ट-वॉश केअरमध्ये RAISE Pep Talk Leave-In Hair Bond Treatment (५० मिली, ₹२,२९९) महत्त्वाची भूमिका बजावते. पाच प्रकारचे प्लांट प्रोटीन, प्लांट ऑइल आणि Citric Acid Concentrate असलेले हे हलके, नॉन-स्टिकी लीव्ह-इन ट्रीटमेंट केसांच्या आतील नुकसान झालेल्या बॉण्ड्सच्या दुरुस्तीला मदत करते. त्यामुळे केस अधिक मजबूत, मऊ, गुळगुळीत आणि चमकदार दिसण्यास मदत होते.

हीट स्टायलिंग करणाऱ्यांसाठी RAISE Prime Time 10-in-1 Hair Primer (२०० मिली, ₹२,४९९) उपयुक्त पर्याय आहे. हे मल्टीफंक्शनल हेअर प्रायमर फ्रिझ कमी करण्यास, चमक वाढविण्यास आणि केसांची मजबुती सुधारण्यास मदत करते. तसेच २३२°C पर्यंतच्या उष्णतेपासून केसांचे संरक्षण करण्यासाठी हे उत्पादन डिझाइन करण्यात आले आहे.

RAISE ही Jean-Claude Biguine Indiaची इन-हाउस प्रीमियम हेअर केअर उत्पादनांची रेंज असून, लक्झरी सलून अनुभवाला पूरक ठरण्यासाठी तिची निर्मिती करण्यात आली आहे. दोन दशकांच्या उद्योग अनुभवासह कोरियन तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित करण्यात आलेली RAISE रेंज नोव्हेंबर २०२४ मध्ये लॉन्च करण्यात आली. ही उत्पादने Jean-Claude Biguine आणि Bounce Salonsमध्ये तसेच RAISE Beauty, Nykaa, Amazon आणि Myntra वर उपलब्ध आहेत.

## शिक्षकांसाठी भव्य AI Education & Technology Summit चे आयोजन

■ भिवंडी (दै. संध्या)

मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या वतीने, प्रा. डॉ. विशाल कडणे यांच्या मार्गदर्शनाखाली “EDUCON 2026 – A Flagship One-Day AI Education & Technology Summit for Teachers” चे आयोजन रविवार, 27 सप्टेंबर 2026 रोजी, सकाळी 9.00 वा., रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे करण्यात आले आहे. शिक्षकांच्या AI कौशल्यविकासासाठी भारतातील सर्वात मोठ्या शिक्षक मेळाव्यांपैकी एक ठरणाऱ्या या विशेष AI लर्निंग वर्कशॉप मध्ये हजारो शिक्षकांना AI चा अध्यापनातील प्रभावी वापर, Lesson Planning, Content Creation, Assessment आणि Classroom Innovation याबाबत प्रात्यक्षिक मार्गदर्शन मिळणार आहे.

या भव्य AI Workshop मधून एकाच ठिकाणी सर्वाधिक शिक्षकांचा सहभाग नोंदवून जागतिक विक्रम (World Record) प्रस्थापित करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे "EDUCON 2026" हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम नसून शिक्षकांच्या AI-सक्षमीकरणाच्या दिशेने एक ऐतिहासिक उपक्रम ठरणार आहे.




सहभागी प्रत्येक शिक्षकाला Participation Certificate तसेच Workshop पूर्ण केल्यानंतर “AI-Competent Teacher” Course Completion Certificate प्रदान करण्यात येणार आहे.

मुंबई व परिसरातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणक्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

इच्छुक शिक्षक, शिक्षण तज्ञ, मुख्याध्यापक, प्राचार्य इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमासाठी https://forms.gle/z7RNzyf2rBj1EA6t6 लिंक वापरून नोंदणी करावी. हा कार्यक्रम पूर्णतः मोफत आहे.

# हिरो मोटोकॉर्पकडून इंटिग्रेटेड-एबीएस असलेली ग्लॅमर एक्स लॉंच

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

हिरो मोटोकॉर्प या जगातील मोटरसायकल आणि स्कूटरच्या सर्वात मोठ्या उत्पादक कंपनीने आज बहुप्रतिक्षित इंटिग्रेटेड-एबीएस असलेल्या ग्लॅमर एक्सच्या लॉंचची घोषणा केली. उद्योगात नवा आदर्श प्रस्थापित करत, ग्लॅमर एक्स १२५ सीसी सेगमेंटमध्ये सिंगल-चॅनेल एबीएससह इंटिग्रेटेड ब्रेकिंग सिस्टम (आयबीएस) असणारी पहिली मोटरसायकल ठरली आहे. हे वैशिष्ट्य मोटरसायकलची स्थिरता मोठ्या प्रमाणात वाढवते आणि ब्रेकिंगचे अंतर कमी करते. यासह प्रगत तंत्रज्ञान सर्वांपर्यंत पोहोचवण्याप्रती आणि रायडर-केंद्रित मोबिलिटी सोल्यूशन्स देण्याप्रती हिरो मोटोकॉर्पची कटिबद्धता अधिक दृढ झाली आहे.

या लॉंचप्रसंगी मत व्यक्त करत हिरो मोटोकॉर्पच्या इंडिया बिझनेस युनिटचे चीफ बिझनेस ऑफिसर आशुतोष वर्मा म्हणाले, "१२५ सीसी सेगमेंटमध्ये झपाट्याने बदल होत आहेत, जिथे ग्राहक आधुनिक डिझाइन, प्रगत तंत्रज्ञान आणि तडजोड न केलेल्या सुरक्षेच्या संयोजनाची मागणी करत आहेत. ग्लॅमर एक्सने राइड मोड्स आणि क्रूझ कंट्रोलसारख्या श्रेणीतील पहिल्या वैशिष्ट्यांसह या क्षेत्रात आधीच क्रांती घडवून आणली आहे. या सेगमेंटमधील पहिली इंटिग्रेटेड एबीएस आणून आम्ही केवळ मोटरसायकल अपग्रेड करत नाही आहोत, तर संपूर्ण श्रेणीच्या सुरक्षेच्या मानकांना नवा आकार देत आहोत. हे लॉंच आमच्या पोर्टफोलिओला अधिक दृढ करते आणि भारतामधील आजच्या काळातील रायडर्सना सक्षम करणारे इंटेलिजंट आणि भविष्यसज्ज मोबिलिटी सोल्यूशन्स प्रदान करते."

ग्लॅमर एक्स १२५ मध्ये पहिल्यांदाच इंटिग्रेटेड अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम तंत्रज्ञान देण्यात आले आहे, जे विविध रस्त्यांच्या परिस्थितीमध्ये अधिक प्रभावी, जलद प्रतिसाद देणारी आणि खात्रीशीर ब्रेकिंग क्षमता प्रदान करते. हे वैशिष्ट्य ग्लॅमर एक्सच्या आधीपासून असलेल्या सुरक्षा यंत्रणेमध्ये भर घालते, ज्यामध्ये पॅनिक ब्रेक अलर्ट - इमर्जन्सी ब्रेक लावल्यास मागील वाहनांना त्वरित सावध करण्यासाठी वेगाने लुकलुकणारे एलईडी विंकर्स आणि आणीबाणीचा इशारा देण्यासाठी हॅझार्ड लॅम्प्सचा समावेश आहे.

ग्लॅमर एक्स १२५ शक्तिशाली, सुबक डिझाइन शैलीसह येते, जी रस्त्यावर आपली मोटरसायकल उठून दिसावी अशी इच्छा असणाऱ्या रायडर्ससाठी खास डिझाइन करण्यात आली आहे. ‘एच’ सिग्नेचरसह फुल एलईडी लाइटिंग पॅकेज आणि स्पोर्टी ग्राफिक्स या मोटरसायकलला रस्त्यावर वेगळी ओळख मिळवून देतात.




आकर्षण अधिक वाढवण्यासाठी या मोटरसायकलमध्ये १०.७ सेमी ॲडॉप्टिव्ह मल्टि-कलर कन्सोल दिला आहे, जो ॲम्बियंट लाइटिंगसह येतो आणि त्यात ६० हून अधिक वैशिष्ट्ये आहेत, ज्यामध्ये गिअर शिफ्ट ॲडव्हायझरी, डिस्टन्स-टू-एम्प्टी आणि रिअल-टाइम मायलेज इंडिकेटर यांचा समावेश आहे. रायडर्स ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी, ईटीए डिस्प्लेसह टर्न-बाय-टर्न नेव्हिगेशन, तसेच कॉल आणि एसएमएस अलर्ट्सद्वारे कनेक्ट राहू शकतात, ज्यामुळे या सेगमेंटमध्ये खऱ्या अर्थाने तंत्रज्ञानावर आधारित राइडिंगचा अनुभव मिळतो.

इंटिग्रेटेड एबीएससह येणाऱ्या ग्लॅमर एक्स १२५ मध्ये स्प्रिंट-ईबीटी इंजिन देण्यात आले आहे, जे ८२५० आरपीएमवर ११.४ बीएचपी (८.५ किलोवॅट) पॉवर देते. हे इंजिन सुरळीत पॉवर डिलिव्हरी आणि कमी एनव्हीएचसाठी डिझाइन केले आहे. रायडर्स वेगवेगळ्या राइडिंगच्या गरजांनुसार इको, रोड आणि पॉवर या तीन राइड मोड्समधून निवड करू शकतात. क्रूझ कंट्रोल प्रवासातील थकवा कमी करते आणि लांबच्या प्रवासात इंधनाची बचत वाढवते.

दैनंदिन प्रवासातील सुलभतेसाठी डिझाइन केलेल्या ग्लॅमर एक्स १२५ मध्ये आरामदायी बसण्याच्या स्थितीसाठी (रायडिंग पोश्चर) रुंद हॅंडलबार, लांब सपाट आरामदायक सीट आणि सहज पोहोचता येईल अशी कमी सीट उंची दिली आहे. रायडरच्या सुविधेमध्ये भर घालण्यासाठी सी-टाइप यूएसबी चार्जिंग पोर्टसह सीटखाली ड्युअल मोबाइल स्टोरेज उपलब्ध आहे.

आपल्या भविष्यवेधी डिझाइनला शोभून दिसावे म्हणून एबीएस असलेली ग्लॅमर एक्स १२५ दोन नवीन रंगांच्या पर्यायांमध्ये लॉंच करण्यात आली आहे - गन मेटल ग्रे आणि मॅट ॲक्सिस ग्रे. याशिवाय ब्लॅक पर्ल रेड आणि ब्लॅक टील ब्लू हे दोन आधीचे रंगही उपलब्ध आहेत, यामुळे ग्लॅमर एक्सच्या नेक्स्ट-जनरेशन रंगांची श्रेणी अधिक विस्तारली आहे. हा नवीन व्हेरिएंट देशभरातील हिरो मोटोकॉर्पच्या डीलरशिप्सवर १,०१,००० रुपये (एक्स-शोरूम, दिल्ली) या आकर्षक किमतीत उपलब्ध आहे.


कार्यालय

**जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे**

कार्यालयाचा पत्ता : प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११.

जा.क्र/जिवअ/पुणे/चौकशी/५२/२०२६ दिनांक : ०२ फेबुवारी २०२६

(जाहीर प्रगटन)

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेच नाव व पत्ता : 1) नुर इ ईलाही सुन्नी जामा मस्जिद 2) हजरत चाँदशाह वली दर्गाह, मौ. खामुंडी, ता. जुन्नर, जि. पुणे (MSBW/PUN/570/2020)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार याकुब इब्राहीम शेख यांनी दि. २७/०१/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सभेत बहुमताद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| ०१ | याकुब इब्राहीम शेख | अध्यक्ष |
| ०२ | अकबर अब्दुलकादर मोमीन | उपाध्यक्ष |
| ०३ | बादशहा पापाभाई मोमीन | सचिव |
| ०४ | जावेद अब्दुल रहेमान मोमीन | खजिनदार |
| ०५ | इस्माईल उर्फ अकबर पापाभाई मोमीन | सभासद |
| ०६ | याकुब हिराभाई तांबोळी | सभासद |
| ०७ | अरीफ प्यारे हुसेन पिरजादे | सभासद |
| ०८ | नजरुद्दीन जैनुद्दीन मोमीन | सभासद |
| ०९ | अल्लीमियाँ पापाभाई मोमीन | सभासद |
| १०. | शकील हाफिज मोमीन | सभासद |
| ११. | परवेज अब्दुल रहेमान मोमीन | सभासद |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे, प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११. येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

शिक्का

सही/-
जिल्हा वक्फ अधिकारी
(पुणे)

## थोडक्यात पण महत्वाचे



### गणेशोत्सवात गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही; २,५७३ जणांवर प्रतिबंधक कारवाई

पिंपरी : दैनिक संध्या

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरोधात मोठी मोहीम हाती घेतली असून अवघ्या काही दिवसांत तब्बल २ हजार ५७३ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय ५८ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असून दोन सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्यांची थेट कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी २२ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवली. शहरातील चारही परिमंडळांमध्ये संशयित आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर लक्ष केंद्रित करून कारवाईचा धडाका लावण्यात आला. या मोहिमेदरम्यान परिमंडळ एकमध्ये ३६२, परिमंडळ दोनमध्ये २४७, परिमंडळ तीनमध्ये ५७२, तर परिमंडळ चारमध्ये तब्बल १ हजार ३९२ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. सर्वाधिक कारवाई परिमंडळ चारमध्ये झाल्याने त्या भागातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांचे विशेष लक्ष असल्याचे दिसून आले. गणेशोत्सव काळात दहशत निर्माण करण्याची शक्यता असलेल्या गुन्हेगारांवर पोलिसांनी कठोर कारवाई केली. महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अंतर्गत ५० आणि कलम ५५ अंतर्गत ८ अशा एकूण ५८ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले. त्यामुळे या गुन्हेगारांना उत्सवकाळात शहराबाहेर राहावे लागणार आहे. सेच दोन सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्यांना कारागृहात पाठविण्यात आले आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या आणि पोलिसांच्या रडारवर असलेल्या गुन्हेगारांना या कारवाईमुळे मोठा धक्का बसला आहे. पोलिसांनी बीएनएसएस कलम १२६ अंतर्गत ४१४ जणांकडून शांतता राखण्याचे बंधपत्र घेतले. कलम १२८ अंतर्गत ३२, तर कलम १२९ अंतर्गत २२० जणांवर कारवाई करण्यात आली. याशिवाय बीएनएस कलम १६८ अंतर्गत १ हजार ८०० जणांना नोटिसा बजावण्यात आल्या. बेकायदा दारूविक्री करणाऱ्या ३५ जणांवरही दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली. गणेशोत्सवाच्या काळात सोशल मीडियाद्वारे अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणारे किंवा आक्षेपार्ह संदेश प्रसारित करणाऱ्यांवरही पोलिसांची करडी नजर आहे. सोशल मीडिया ग्रुप ॲडमिननी ग्रुपमधील मजकुरावर लक्ष ठेवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, “गणेशोत्सव उत्साहात साजरा करा; मात्र कायदा हातात घेऊ नका. दहशत, हुल्लडबाजी किंवा कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना मुळीच थारा दिला जाणार नाही. संशयास्पद हालचाली किंवा भडकावू संदेश आढळल्यास त्यावर विश्वास न ठेवता तात्काळ पोलिसांशी अथवा ११२ क्रमांकावर संपर्क साधावा.”

### जुन्नरच्या रणरागिणी आशाताई बुचके यांच्या निधनाने सामाजिक, राजकीय क्षेत्राची मोठी हानी

पिंपरी : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील कणखर आणि संघर्षशील नेतृत्व, गोरगरीब, वंचित आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव आवाज उठविणाऱ्या आशाताई बुचके यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दुःखद आणि मन हेलावून टाकणारी आहे. त्यांच्या निधनाने जुन्नर तालुक्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक रणरागिणी, संवेदनशील नेत्या आणि आशादायी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. आशाताई बुचके यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत सर्वसामान्य जनतेशी असलेली नाळ कायम जपली. गोरगरीब, कष्टकरी, वंचित आणि गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्या सातत्याने पुढाकार घेत होत्या. अन्यायाविरोधात ठामपणे भूमिका घेण्याची त्यांची वृत्ती आणि जनतेच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याची त्यांची जिद्द यामुळे त्यांनी जुन्नर तालुक्याच्या सार्वजनिक जीवनात आपली वेगळी ओळख निर्माण केली. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे नेतृत्व म्हणून आशाताई बुचके यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेकांना त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. कार्यकर्त्यांना बळ देतानाच सामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची त्यांची संवेदनशीलता कायम प्रेरणादायी राहिली. आशाताई बुचके यांच्या निधनाने जुन्नर तालुक्याच्या सार्वजनिक जीवनाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहजासहजी भरून निघणारी नाही. त्यांनी जपलेली जनसेवेची भावना, संघर्षाची भूमिका आणि सर्वसामान्यांसाठी काम करण्याची तळमळ पुढील पिढ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी राहील.

### संत ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वसामान्यांपर्यंत अध्यात्म पोहोचविले : संजय कुलकर्णी

पिंपरी : दैनिक संध्या

संत ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थ दिपिका हा ग्रंथ लिहून सर्वसामान्यांपर्यंत अध्यात्म पोहोचविण्याचे मोठे काम केले. त्यांचे हे कार्य लक्षात घेता अध्यात्मिक लोकशाहीचे जनक म्हणून ज्ञानेश्वर महाराजांचा उल्लेख करावा लागेल असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक संजय कुलकर्णी यांनी केले. ज्ञानेश्वर महाराजांच्या जयंतीनिमित्त पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या मासिक सभेत ते बोलत होते. शनिवार दि. १२ रोजी सायंकाळी बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणाच्या परिसरात हा कार्यक्रम झाला. प्रारंभी विलास भाले, अक्षय वडनेरकर, शैलजा लोकरस, मंगला कुलकर्णी , मीनाक्षी कुलकर्णी, अनुराधा निलेगावकर यांच्याहस्ते ज्ञानेश्वर महाराजांचे प्रतिमा पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उषा भागवत, शशिकांत कुलकर्णी, मीनाक्षी कुलकर्णी यांनी भक्तीगीते सादर केली. अक्षय वडनेरकर यांनी घरातील प्रत्येक कुटुंबप्रमुखाने पुढील पिढीला आपल्या घराण्याची परंपरा, चालीरीती, कुलधर्म याबाबत माहिती देण्याचे आवाहन केले. भाग्यश्री गोखले यांनी संस्थेतील सभासदांच्या कुटुंब सहलीचे वर्षातून एकदा नियोजन करण्याची सुचना मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षीय समारोप विलास जोशी यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन स्नेहा चिंचवडकर यांनी केले.

### देहू-आळंदी मेट्रो मार्गासाठी सुनेत्रा पवार यांच्याकडे पाठपुरावा

पिंपरी : दैनिक संध्या

देहू-आळंदी प्रस्तावित मेट्रो मार्गासह प्रभागातील विविध विकासकामे आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक यश साने यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुण्यात सदिच्छा भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. देहू ते आळंदी हा प्रस्तावित मेट्रो मार्ग परिसरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासह नागरिकांना सक्षम, जलद आणि सुलभ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला शासनस्तरावर आवश्यक गती मिळावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



## कॉपर चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

■ पिंपरी : (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट-४ पथकाने कॉपर चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तब्बल १९ लाख ८४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून तळेगाव एमआयडीसी, चिखली आणि देहूरोड परिसरातील एकूण ९ गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस आयुक्तालय हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त घालत असताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजाराम लोणकर आणि पोलीस शिपाई रामदास मेरगळ यांना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून सहा संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १८ लाख ७४ हजार रुपयांचे कॉपर, एक चारचाकी वाहन आणि आयशर वाहन जप्त करण्यात आले.

तपासादरम्यान आरोपींनी तळेगाव एमआयडीसी व चिखली परिसरातील विविध ठिकाणांवरील वीज वितरण ट्रान्सफॉर्मर (डीपी) मधील कॉपर वायर आणि केबल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी पडताळणी केली असता तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यातील सहा आणि चिखली पोलीस ठाण्यातील दोन असे एकूण आठ गुन्हे या टोळीशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले.

याचबरोबर गुन्हे शाखा युनिट-४ पथकाने देहूरोड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या केबल चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास करत सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी अजय प्रल्हाद गायकवाड (रा. चिखली) याला अटक केली. त्याच्याकडून केबल वायर, दोन ग्राइंडर मशीन, दोन रेग्युलेटर आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा १ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यातील सहा, चिखली पोलीस ठाण्यातील दोन आणि देहूरोड पोलीस ठाण्यातील एक असे एकूण नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत. ही उल्लेखनीय कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन घोडेपाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले व गुन्हे शाखा युनिट-४, सहायक पोलीस फौजदार लोणकर, वायभसे, पोलीस हवालदार मोरे, महाडीक, सोडगीर, असवले, सोनटक्के, बोराटे, पोलीस शिपाई मेरगळ, वेताळ, खेडकर, सुखदाने, मुंडे, नागरे, सोनवणे, बाळसराफ, खराडे, माटे तसेच तांत्रीक विश्लेषन शाखेकडील सहायक पोलीस फौजदार माळी, पोलीस हवालदार ननावरे, पोलीस शिपाई कारके यांनी केली आहे.

## पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय सदस्यपदी बनसोडे यांची निवड



■ पिंपरी (दै. संध्या)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी स्थापन केलेल्या ऐतिहासिक पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय सदस्यपदी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष तथा आमदार अण्णा बनसोडे यांची निवड झाली आहे. या गौरवपूर्ण नियुक्तीबद्दल पिंपरी-चिंचवड शहरातील विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी पिंपरी येथील जनसंपर्क कार्यालयात भेट देत त्यांचा उत्साहात सत्कार केला.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ, शाल आणि शुभेच्छा देऊन अण्णा बनसोडे यांचे अभिनंदन केले. पिंपरी-चिंचवडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधीची अशा ऐतिहासिक आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेवर झालेली नियुक्ती शहरासाठी अभिमानास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सत्कार कार्यक्रमात रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे नेते राहुल डंबाळे, रिपब्लिकन पक्षाचे नेते सुरेश निकाळजे, लढा युथ मूव्हमेंटचे प्रमोद क्षिररसागर, अंजना गायकवाड, माधव मुळे, स्वप्निल रोकडे, राहुल सोनवणे, संदीप पिसाळ यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, बहुजन आणि दुर्बल घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. या संस्थेने देशातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. अशा संस्थेच्या शासकीय सदस्यपदी अण्णा बनसोडे यांची निवड होणे ही पिंपरी-चिंचवडसाठी गौरवाची बाब असल्याचे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, या नियुक्तीच्या पार्श्वभूमीवर पुढील आठवड्यात शहरात भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी ‘विधानसभा उपाध्यक्ष माननीय आमदार अण्णा बनसोडे गौरव समिती’ स्थापन करण्यात आली असून समितीच्या वतीने मोठ्या प्रमाणावर सर्वसमावेशक कार्यक्रमाचे नियोजन सुरू आहे. कार्यक्रमाची तारीख, वेळ आणि स्थळ लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

अण्णा बनसोडे यांच्या या नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी अधिक बळकट होईल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा अधिक प्रभावीपणे पुढे नेला जाईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## यशवंतनगर चौकातील ‘नट-बोल्ट’ शिल्प स्थलांतरित करा

■ पिंपरी(दै. संध्या)

निगडी-भोसरी बीआरटी मार्गावरील टाटा मोटर्सजवळ असलेल्या यशवंतनगर चौकात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेले भव्य ‘नट-बोल्ट’ शिल्प वाहतुकीस अडथळा ठरत असल्याचा आरोप करत युवासेनेचे उपशहर प्रमुख कुणाल जगनाडे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे ते अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी केली आहे.

महापालिकेला दिलेल्या निवेदनात जगनाडे यांनी म्हटले आहे की, यशवंतनगर चौक हा एमआयडीसी परिसर आणि नागरी वस्तीला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा चौक आहे. या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, औद्योगिक कर्मचारी, शालेय विद्यार्थी तसेच सार्वजनिक वाहतूक आणि जड वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असते. मात्र चौकात उभारण्यात आलेल्या अवाढव्य नट-बोल्ट शिल्पामुळे वाहतूक सिग्नल स्पष्टपणे दिसत नसल्याने वाहनचालकांचा गोंधळ उडत आहे.

ल्पिामुळे वाहनांना सरळ मार्गाने जाता येत नसून त्याभोवती वळसा घालावा लागत असल्याने वाहतुकीची गती मंदावते आणि कोंडी निर्माण होते. तसेच अचानक ब्रेक लावण्याच्या घटना वाढत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी दररोज लहान-मोठे अपघात घडत असल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या शिल्पाचे तातडीने तांत्रिक परीक्षण करून वाहतुकीला अडथळा होणार नाही अशा योग्य ठिकाणी स्थलांतर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच चौकातील सिग्नलची दृश्यमानता, वाहतूक नियोजन आणि रस्त्यांची रचना सुधारण्याचीही सूचना करण्यात आली आहे. या जनहिताच्या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन महापालिकेने तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी युवासेनेचे उपशहर प्रमुख कुणाल जगनाडे यांनी केली आहे.





## काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट असलेली थार कार पोलिसांनी घेतली ताब्यात

■ पिंपळे सौदागर (दै. संध्या)

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून काळ्या काचा आणि फॅन्सी नंबर प्लेट लावून फिरणाऱ्या महिंद्रा थार कारवर कारवाई करण्यात आली आहे. पिंपरी वाहतूक पोलिसांनी एमएच 14 एलजे 2525 क्रमांकाच्या थार कारची तपासणी करून वाहन ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित थार कारच्या काचांवर नियमानुसार परवानगी नसताना काळी फिल्म लावण्यात आली होती. तसेच वाहनावर नियमबाह्य फॅन्सी नंबर प्लेट बसविण्यात आली होती. या प्रकारामुळे वाहनाची ओळख पटविण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी वाहनचालका विरोधात मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करत वाहन जप्त केले आहे. शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर विशेष मोहीम राबविण्यात येत असून काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट, सायरन, बेकायदा फ्लॅश लाईट आणि इतर नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून कायदेशीर स्वरूपातील नंबर प्लेटचा वापर करावा तसेच वाहनांमध्ये कोणतेही अनधिकृत बदल करू नयेत, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.






## थोडक्यात पण महत्वाचे



### वाकी खुर्द येथील राणूबाई सोसायटीचा जिल्हा बँकेकडून गौरव

**चाकण : दैनिक संध्या**

सोसायटीचा व्यवहार पारदर्शकपणे ठेवणाऱ्या खेड तालुक्यातील वाकी खुर्द येथील श्री राणूबाई विकास कार्यकारी सोसायटीचा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने उत्कृष्ट कामगिरीबद्दल विशेष गौरव करण्यात आला. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन दिगंबर दुर्गाडे व खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आदींच्या हस्ते राणुबाई सोसायटीचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह, पुष्पगुच्छ व ढाल देऊन गौरव करण्यात आला. चाकण लगतच्या वाकी खुर्द येथील श्री राणूबाई विकास कार्यकारी संचालक मंडळाने सर्वांना बरोबर व विश्वासात घेऊन सन २०२५ - २०२६ या वर्षात सर्वोत्कृष्ट काम केले. त्यांच्या या कामाची दखल घेत जिल्हा बँकेने राणुबाई सोसायटीला खेड तालुका पातळीवर प्रथम क्रमांक व ढाल देऊन गौरव केला. श्री राणूबाई विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेला जिल्हा बँकेने ढाल देऊन गौरव केल्याने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व संचालक मंडळाने पंचक्रोशीत नवचैतन्याची दिवाळी साजरी केली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार जाधव, उपाध्यक्ष दिलीप परदेशी, माजी चेअरमन नितीन जाधव, संतोष जाधव, सिताराम वहिले, श्रीकृष्ण पाटील, सोनबा जाधव, दत्तात्रय जाधव, तानाजी दौंडकर, विभागीय अधिकारी रघुनाथ मुळूक, विकास अधिकारी सर्जेराव काळे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पारंपरिक वाद्यांच्या गजरात आळंदीत गणरायाचे आगमन

**आळंदी : दैनिक संध्या**

गणेश चतुर्थीनिमित्त आळंदी शहरात सार्वजनिक गणेश मंडळांसह घरगुती गणरायाचे पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात उत्साहात स्वागत करण्यात आले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने आळंदी नगरी भक्तिमय झाली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात गणेश चतुर्थीनिमित्त गणरायाचे विधिवत पूजन करून गणेशोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. प्रमुख विश्वस्त भावार्थ रामचंद्र देखणे यांच्या हस्ते गणेशपूजा करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त मंदिरात दररोज हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेतही गणेशमूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली. संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. गणरायाच्या आगमनाने शिक्षण संस्थेच्या परिसरातही उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.




# खुटबावच्या संशयित बनावट कॅल्शियम प्रकरणात 'तेरी भी चूप, मेरी भी चूप'ची चर्चा!

■ केडगाव (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील खुटबाव येथील जनावरांसाठी विक्री झालेल्या संशयित कॅल्शियम उत्पादनाबाबत प्रसिद्ध झालेल्या सर्वत्र प्रसारमाध्यमात आता पुणे जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. प्रकरणाची माहिती जाणून घेण्यासाठी ड्रग्स इन्स्पेक्टर यांच्याशी संपर्क साधला असता, मेडिकलमधील औषधांवर आमचे नियंत्रण असते; मात्र संबंधित उत्पादन 'फूड'च्या श्रेणीत येत असेल तर ते आमच्या नियंत्रणात येत नाही, अशी भूमिका सांगण्यात आल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, देशातील अन्नसुरक्षा यंत्रणेकडे Health Supplements आणि त्यासंबंधी स्वतंत्र नियम आहेत; मात्र एखादे उत्पादन नेमके 'फूड' आहे की 'ड्रग', हे त्याच्या लेबलिंग, रचना, दावे आणि कायदेशीर वर्गीकरणावर अवलंबून असते. त्यामुळे खुटबावच्या उत्पादनाची नेमकी कायदेशीर श्रेणी कोणती, याचा अधिकृत खुलासा होणे गरजेचे आहे.

जर हे उत्पादन औषध नसून फूड/सप्लिमेंट असल्याचे संबंधित यंत्रणा सांगत असेल, तर मग त्याचे उत्पादन, लेबलिंग, गुणवत्ता, परवाना, वितरण आणि विक्री यांची तपासणी कोण करणार? हा प्रश्न आता केवळ खुटबावपुरता राहिलेला नाही.




पुणे विभागात अन्नसुरक्षेबाबत अलीकडे मोठ्या प्रमाणावर तपासण्या आणि कारवाया झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे संशयित कॅल्शियमच्या प्रकरणातही संबंधित विभागांनी पुढे येऊन उत्पादनाचे नमुने तपासणीसाठी घ्यावेत, अशी मागणी होत आहे.

संशयित उत्पादनाबाबत एक विभाग दुसऱ्या विभागाकडे बोट दाखवत असेल आणि दुसरीकडे संबंधित मेडिकलमधून साठा नष्ट झाल्याची माहिती समोर येत असेल, तर सामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण होत असून, या घटनेत आर्थिक मलिदा कुणी लाटला हे सर्वांना ठाऊक आहे त्यामुळे 'तेरी भी चूप मेरी भी चूप'.

दरम्यान, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर 'गजानन मेडिकल' नावाच्या संस्थेच्या दौंड तालुक्यात सुमारे १३ शाखा असल्याची माहिती स्थानिक पातळीवर चर्चेत आहे. यापैकी कोणत्या शाखेत संशयित कॅल्शियमची विक्री झाली, त्याचा पुरवठा कुठून झाला आणि सध्या या शाखांमध्ये आणखी कोणता पशुवैद्यकीय औषध/सप्लिमेंटचा साठा उपलब्ध आहे, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. गजानन मेडिकल'चा आका कोण? हा प्रश्नही चर्चेत स्थानिक चर्चेत 'गजानन मेडिकल'च्या संपूर्ण व्यवसायाचे नियंत्रण नेमके कोणाकडे आहे आणि संबंधित उत्पादनाच्या खरेदी-विक्रीमध्ये कोणाची भूमिका होती, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा अजूनही कायम आहे.

मेडिकलवर कारवाई करणारे डॉक्टर कोण होते?त्यांनी कोणत्या अधिकाराने साठा ताब्यात घेतला?साठा नष्ट करण्याचे आदेश कोणी दिले?नष्ट करण्यापूर्वी नमुने घेतले का?पंचनामा झाला का? या प्रश्नांची उत्तरे न मिळाल्यास या प्रकरणावर संशयाचे सावट कायम राहणार आहे.

या प्रकरणात एक लाख रुपयांच्या कथित व्यवहाराची चर्चा असल्याचेही समोर येत आहे. संबंधित कंपनीचे नाव/ब्रँडिंग वापरल्यामुळे कंपनीची बदनामी झाल्याच्या कारणातून हा कथित व्यवहार झाला का, याबाबत कोणताही अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही.

मूक्या जनावरांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने या प्रकरणात कोणालाही वाचविण्याऐवजी, पुराव्यांच्या आधारे स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणार का? आता दौंडकरांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील पावलाकडे लागले आहे.

## जादूटोण्याच्या संशयास्पद वस्तू ठेवून महिलेचा विनयभंग; एकावर गुन्हा

■ यवत (दै. संध्या)

घराच्या दरवाजाबाहेर जादूटोणा करण्याच्या उद्देशाने कुंकू लावलेला दगड, पांढरे अंडे, टाचण्या टोचलेली काळी बाहुली, लिंबू व लाल रंगाची पुडी ठेवून त्यानंतर महिलेला घराबाहेर ओढून तिची साडी ओढत विनयभंग केल्याप्रकरणी यवत पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी सदर महिलेने यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून अरुण रामभाऊ दोरगे (रा. आनंदग्राम सोसायटी, यवत) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिलेल्या माहितीनुसार, ११ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजल्यापासून १२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री सुमारे पावणे एक वाजेपर्यंतच्या कालावधीत फिर्यादीच्या घरासमोर संशयास्पद वस्तू ठेवण्यात आल्याचे आढळले. या वस्तू जादूटोणा किंवा अघोरी कृत्य करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

त्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घराच्या दरवाजावर जोरजोरात लाथा मारल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरवाजा उघडल्यानंतर त्याने फिर्यादीला बाहेर ओढून घेतले. फिर्यादीने प्रतिकार केला असता आरोपीने तिची साडी ओढून मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप आहे. तसेच शिवीगाळ करून धमकीवजा वक्तव्य केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. घटनेदरम्यान महिलेचे पती व दोन्ही मुले बाहेर आल्यानंतर आरोपी तेथून पळून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी यवत पोलिस ठाण्यात गुन्हा महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गणपती बाप्पाचे मनमोहक रूप पाहून एक चिमुकली मंत्रमुग्ध होऊन गेली



*जेजुरी (दै. संध्या) : राज्यात सर्वत्र लाडक्या गणरायाचे अतिशय जल्लोषात आगमन झाले. जेजुरी येथील कुंभारवाड्यात गणपती आणण्यासाठी गेलेली एक चिमुकली गणपती बाप्पाचे सुंदरसे रूप पाहून मंत्रमुग्ध झालेली होती.* फोटो : नितीन राऊत

## करंदी येथे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा ८०६ वा अवतारदिन महोत्सव उत्साहात

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत पुणे जिल्हा महानुभाव परिषद यांच्या विद्यमाने करंदी येथे आयोजित करण्यात आलेला सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी यांचा ८०६ वा अवतारदिन महोत्सव अत्यंत भक्तिमय, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. अफाट जनसमुदायाच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात धार्मिक, सामाजिक व आध्यात्मिक एकतेचे दर्शन घडले. महोत्सवाच्या आयोजनात आयोजक, ग्रामस्थ, साधू-संत, तपस्विनी माता, बालगोपाल आणि सद्भक्त यांनी निस्वार्थ भावनेने सेवा बजावली.

दिवसभर विविध सेवा करत असतानाही सेवेकऱ्यांच्या चेहऱ्यावर थकवा नव्हता, उलट समाधान, आनंद आणि भक्तिभावाचे भाव दिसून येत होते. उपस्थित भाविकांनीही कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक केले. भाविकांच्या सोयीसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था, मार्गदर्शन नकाशा, देवपूजेसाठी शिस्तबद्ध रांगा व सुयोग्य मांडणी करण्यात आली होती. देवपूजेनंतर संत-महंतांच्या भेटीची व्यवस्था, प्रवचने, निरुपण तसेच प्रसादसेवेचे नियोजनही अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले. घरी परतताना भाविकांपर्यंत सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींच्या ब्रह्मविद्या ज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने ग्रंथ, पुस्तिका व नामस्मरणीय गाठी भेट देण्यात आल्या. ३५ मठ-मंदिरांच्या कुलवंदनाचे विशेष आकर्षण- महोत्सवातील प्रमुख आकर्षण ठरले ते पुणे जिल्ह्यातील ३५ मठ-मंदिरांच्या कुलवंदनाचे दर्शन. या दर्शनाचा लाभ घेण्यासाठी हजारो भाविकांनी दोन ते तीन तास रांगेत उभे राहून भक्तिभावाने सहभाग नोंदविला. यासोबतच मोठ्या संख्येने भाविकांनी प्रसादसेवेचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, सात्त्विकता आणि समन्वयाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. धर्मवार्ता, प्रवचने आणि निरूपणातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक प्रेरणा मिळाली.

महानुभाव पंथाचे महात्म्य, परमेश्वरभक्ती आणि ब्रह्मविद्या यांचे महत्त्व प्रभावीपणे विशद करण्यात आले. प्रसादवंदन, संत-महंत आणि वासनिक यांचा त्रिवेणी संगमही उपस्थितांना विशेष भावला. संत-महंतांचे मार्गदर्शन-कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख प्रवचनकार म्हणून महानुभाव पंथाचे ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासक व आचार्य प.पू. श्री हंसराज बाबाजी खामणेकर यांनी मार्गदर्शन केले. महंत कृष्णराज बाबा शास्त्री (शिक्रापूर) यांनीही आपल्या विचारांतून उपस्थितांना प्रेरित केले. पुणे जिल्हा महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत रामचंद्र बाबा गुर्जर तसेच पुणे जिल्ह्यातील विविध मठ-मंदिरांचे संचालक, संत-महंत, साधू-संत व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदिप दिवाकर बाबा अकुंळनेकर (जातेगाव) यांनी केले. सूत्रसंचालन अनिलराज मराठे (देहू) व मुळावकर बाबा (वढू) यांनी केले. ढोकले परिवाराचा सिंहाचा वाटा - या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनामागे करंदी गावातील सद्भक्त, ग्रामस्थ आणि विशेषतः दानशूर व्यक्तिमत्त्व असणारे अमर ढोकले तसेच ढोकले परिवाराचा सिंहाचा वाटा असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध स्तरांतून सहकार्य करणाऱ्या सर्वांचे ढोकले परिवाराच्या वतीने आभार मानण्यात आले. अफाट जनसमुदाय, उत्कृष्ट नियोजन, सात्त्विक वातावरण आणि भक्तिभावाने ओतप्रोत भरलेला हा अवतारदिन महोत्सव उपस्थित भाविकांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली.

# आपत्कालीन क्षणी पोलीस केवळ मदतीला धावणार नाहीत, तर जीव वाचवण्यासाठीही सज्ज!

**बारामती शहर पोलिसांना CPR व Basic Life Support चे प्रात्यक्षिक प्रशिक्षण; NIMA बारामती व IDA बारामती-फलटण शाखेचा स्तुत्य सामाजिक उपक्रम**

■ बारामती (दै. संध्या)

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीतही तातडीने जीवनरक्षक मदत करता यावी, या उद्देशाने बारामती शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी CPR व Basic Life Support (BLS) प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय एकात्मिक वैद्यकीय संघटना (NIMA), बारामती व इंडियन डेंटल असोसिएशन (IDA), बारामती-फलटण शाखेच्या डॉक्टरांच्या टीमने सामाजिक बांधिलकीतून हे प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह दिले.

पोलीस हे अनेकदा अपघात, गर्दी, मिरवणूक, सार्वजनिक कार्यक्रम किंवा अन्य आपत्कालीन घटनांच्या ठिकाणी सर्वप्रथम पोहोचणाऱ्या यंत्रणांपैकी एक असतात. एखाद्या व्यक्तीला अचानक Cardiac Arrest आल्यास किंवा त्याचा श्वासोच्छ्वास बंद झाल्यास वैद्यकीय मदत उपलब्ध होईपर्यंतची सुरुवातीची काही



मिनिटे अत्यंत महत्त्वाची असतात. अशा निर्णायक क्षणी योग्य पद्धतीने CPR देता आल्यास संबंधित व्यक्तीचे प्राण वाचविण्याच्या प्रयत्नांना मोठी मदत होऊ शकते.

याच अनुषंगाने डॉक्टरांच्या टीमने उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदारांना CPR म्हणजे काय, त्याचे महत्त्व, Cardiac Arrest ची लक्षणे कशी ओळखावीत, व्यक्तीची प्रतिसादक्षमता व श्वासोच्छ्वास कसा तपासावा, आपत्कालीन वैद्यकीय मदत कशी बोलवावी आणि आवश्यक परिस्थितीत CPR ची प्रक्रिया योग्य रीतीने कशी करावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे जीवनरक्षक प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यात आल्याने अधिकारी व अंमलदारांना आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या तातडीच्या कृतींची माहिती देण्यात आली.

विशेषतः गणेशोत्सव, पालखी सोहळे, मिरवणुका, बंदोबस्त तसेच मोठ्या गर्दीच्या कार्यक्रमांमध्ये हजारो नागरिक एकत्र येतात. अशा गर्दीमध्ये एखाद्या नागरिकाला अचानक हृदयविकाराचा त्रास, Cardiac Arrest, श्वासोच्छ्वासासंबंधी गंभीर समस्या किंवा अन्य वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास घटनास्थळी उपस्थित प्रशिक्षित पोलीस कर्मचारी तातडीचा प्रथम प्रतिसाद देऊ शकतील, या उद्देशाने सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

पोलीस दलाचे काम केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरते मर्यादित नसून संकटाच्या प्रत्येक क्षणी नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे हेदेखील पोलिसांच्या सेवाभावाचे महत्त्वाचे अंग आहे. त्यामुळे बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलिसांना अशा जीवनरक्षक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणे हे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहे.

या उपक्रमाला केवळ पोलीस स्टेशनपुरते मर्यादित न ठेवता त्याची व्याप्ती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबाबतही डॉक्टरांच्या टीमशी सकारात्मक चर्चा करण्यात आली. बारामती शहरातील मार्केट परिसर, एस.टी. स्टँड, शाळा, महाविद्यालये तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असणाऱ्या ठिकाणी CPR व प्राथमिक जीवनरक्षक प्रशिक्षण उपक्रम आयोजित करून अधिकाधिक नागरिकांना प्रशिक्षित प्रथम प्रतिसादक बनविण्याचा प्रयत्न करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

एखाद्या आपत्कालीन प्रसंगी डॉक्टर किंवा रुग्णवाहिका येईपर्यंत आपल्या शेजारी असलेल्या व्यक्तीला नेमके काय करावे हे माहीत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे "प्रत्येक कुटुंबात आणि समाजाच्या प्रत्येक घटकात किमान एक प्रशिक्षित प्रथम प्रतिसादक तयार व्हावा" या व्यापक सामाजिक उद्देशातून अशा प्रशिक्षणाचा नागरिकांपर्यंत विस्तार करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

सदर उपक्रम पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणासाठी आपला बहुमूल्य वेळ देऊन पोलिसांना जीवनरक्षक कौशल्यांचे प्रशिक्षण देणाऱ्या NIMA बारामती व इंडियन डेंटल असोसिएशन, बारामती-फलटण शाखेच्या डॉक्टरांच्या संपूर्ण टीमचे बारामती शहर पोलीस स्टेशनच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. समाजातील वैद्यकीय तज्ज्ञ आणि पोलीस यंत्रणा एकत्र येऊन नागरिकांच्या जीवितरक्षणासाठी पुढाकार घेत असल्याने हा उपक्रम "पोलीस आणि डॉक्टर, दोघांचेही ध्येय एकच, संकटात नागरिकाचा जीव वाचविणे" या सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### प्रवाशांच्या सेवेसाठी एसटीचा ताफा अधिक सक्षम होणार

मुंबई : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य प्रवाशांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या एसटी अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी, दर्जेदार आणि विश्वासाई सार्वजनिक वाहतूक सेवा देण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने बसताफ्याच्या विस्तारासोबतच आधुनिकीकरणाला वेग दिला आहे. नव्या बसेसच्या माध्यमातून एसटीची सेवा अधिक सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला असून, त्याच दिशेने पाच हजार 'लालपरी' बसेसच्या खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या निविदा प्रक्रियेत सर्वांत कमी दराचा देकार टाटा मोटर्ससारख्या नामांकित आणि विश्वासाई संस्थेने सादर केला आहे. त्यामुळे बसेसच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, नव्या पाच हजार 'लालपरी' बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्यानंतर ग्रामीण महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीला मोठी बळकटी मिळणार आहे. नव्या बसेसमुळे जुन्या बसेसवरील ताण कमी होईल, बसफेऱ्यांची उपलब्धता वाढविणे शक्य होईल आणि प्रवाशांना अधिक चांगली सेवा देता येईल. जुन्या व गळक्या बसेस तसेच प्रवासादरम्यान बसेस बंद पडण्याच्या समस्येवरही नव्या ताफ्यामुळे प्रभावीपणे मात करता येणार आहे. पुढील सहा महिन्यांत सुमारे पाच हजारांहून अधिक जुन्या बसेस प्रवासी सेवेतून कालबाह्य होणार आहेत. एसटी महामंडळाने यापूर्वीच बसताफ्याच्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. २ बाय २ आसन व्यवस्थेच्या २,६४० 'लालपरी' बसेस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या तीन हजार 'राजमाता जिजाऊ' बसेस ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नव्या बसेसच्या समावेशामुळे एसटीचा ताफा अधिक तरुण, सक्षम आणि प्रवाशांच्या गरजांशी सुसंगत होत आहे. नव्या पाच हजार बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर 'मागेल त्याला बसफेरी' उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बसफेरीचा फायदा झाला नाही तरी चालेल; मात्र बसफेरीची मागणी करणाऱ्यांनी ती फेरी तोट्यात चालणार नाही, याची हमी घ्यावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

### सिंधुदुर्ग विकासाच्या नव्या वळणावर

मुंबई : जहाजबांधणी उद्योगाच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच जलवाहतूक, चिपी विमानतळ आणि दर्जेदार रस्त्यांच्या जाळ्याद्वारे दळणवळणाचा विस्तार केला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून वातावरणातील बदलांपासून हापूस आंबा, काजू आणि कोकम पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. जहाजबांधणीसारखे पर्यावरणपूरक उद्योग सिंधुदुर्गात आणण्यासोबतच आधुनिक मत्स्यव्यवसाय, स्थानिक कला व संस्कृतीच्या विकासासाठी कलाकारांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावरही भर आहे. सक्षम आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, शून्य कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पूर व दरड प्रतिबंधक उपाययोजना तसेच प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यांना प्राधान्य देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल, पर्यटन, शेती-मत्स्यव्यवसाय, रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीच्या माध्यमातून सिंधुदुर्गला शाश्वत आर्थिक विकासाच्या दिशेने नेण्याचा सुरू आहे. निसर्गाचे मुक्त वरदान लाभलेला, अथांग अरबी समुद्रकिनारा आणि हिरवागार सह्याद्री यांची समृद्ध देणगी लाभलेला सिंधुदुर्ग जिल्हा आज शाश्वत प्रगतीच्या एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. निसर्गसौंदर्य जपत असताना जिल्ह्याला आर्थिक सुबत्तेकडे कसे नेता येईल, हा प्रश्न कोकणाच्या संदर्भात नेहमीच कळीचा राहिला आहे. पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक उन्नती या दोन्ही गोष्टींचा समांतर समतोल साधत जिल्हा प्रशासन अत्यंत नियोजनबद्धरीतीने या ध्येयाकडे वाटचाल करत आहे. उद्देश एकच पर्यावरणपूरक विकास आणि रिव्हर्स मायग्रेशन. विकास आराखडा तयार करताना पर्यावरण आणि प्रगती हे एकमेकांशी विसंगत नसून परस्परपूरक आहेत, हे तत्त्व केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

*भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.*

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (Standstill Agreement) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्धचा संघर्ष वाढत गेला.



हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक आणि राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

मराठवाड्यातील मुक्तिसंग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा आणि बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले.

काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्तिसंग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला.

प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागामुळे मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद संस्थान भारतीय संघात विलीन झाले.

केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदींमध्ये या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित करण्यात आले आहे.स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला. भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय आणि प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.

भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्तिसंग्राम दिन' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो.

विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्तिसंग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते.महाराष्ट्र शासन मुक्तिसंग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो. मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला.त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे.१७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

# लॅबग्रोन डायमंड उद्योगात भारताचे जागतिक नेतृत्व; नवी मुंबईत जेम्स अँड ज्वेलरी पार्क

■ मुंबई(दै. संध्या)

प्रयोगशाळेत विकसित होणाऱ्या हिऱ्यांच्या (लॅबग्रोन डायमंड) निर्मितीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीपासून दागिन्यांचे उत्पादन, ब्रँडिंग, शोरूम आणि जागतिक विक्री व्यवस्थेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी भारतात उभारावी. या उदयोन्मुख क्षेत्रात भारतीय उद्योगाने जागतिक नेतृत्व प्रस्थापित करावे, असे आवाहन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.



भारतातील रत्न व आभूषण उद्योगातील उत्कृष्टता, नेतृत्व आणि उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करणारा ५२ वा 'इंडिया जेम्स अँड ज्वेलरी अवॉर्ड्स' सोहळा मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात केंद्रीय मंत्री अमित शाह प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, पणन मंत्री जयकुमार रावल, खासदार गोविंद ढोलकिया, आमदार अमित साटम आणि कौन्सिलचे अध्यक्ष किरीट भन्साळी यांची प्रमुख उपस्थिती होती. यांच्यासह रत्न व आभूषण क्षेत्रातील उद्योजक, निर्यातदार, उत्पादक, बँकर्स, महिला उद्योजक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, भारताकडे पायाभूत सुविधा, ऊर्जा, भांडवल आणि उद्यमशील व्यापारी वर्गाचे सामर्थ्य आहे. लॅबग्रोन डायमंडची जागतिक बाजारपेठ आगामी काळात मोठ्या प्रमाणात विस्तारण्याची शक्यता आहे. त्यामुळे या क्षेत्रातील संधी ओळखून भारतीय उद्योगाने केवळ कामाची गतीच नव्हे, तर व्यवसायाची व्याप्तीही वाढवावी. भारतीय कंपन्यांनी जागतिक ब्रँड निर्माण करून प्रमुख शहरांमध्ये स्वतःची विक्री केंद्रे उभारावीत. यासाठी केंद्र सरकार आवश्यक ते सर्व सहकार्य करेल.

रत्न व आभूषण उद्योगासाठी नवी मुंबईत मोठी जागा आणि आवश्यक एफएसआय उपलब्ध करून देण्याची भूमिका मांडली आहे. हा उद्योग महाराष्ट्राबाहेर जाऊ नये, यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचेही केंद्रीय मंत्री शाह यांनी सांगितले.

भारताची रत्ने आणि आभूषणे ही हजारो वर्षांपासून जगभरातील ओळख आहे. सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीपासून भारतातून रत्ने व आभूषणांचा व्यापार होत असल्याचे नमूद करून केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, मध्ययुगीन काळात राजाश्रयामुळे जडजवाहीर आणि आभूषण कलेला नवी उंची मिळाली. कुंदन, मीनाकारी यांसारख्या कलांचा विकास झाला. जयपूरची ओळख आजही रंगीत रत्नांची जागतिक राजधानी म्हणून आहे.

जगभरात पैलू पाडल्या जाणाऱ्या प्रत्येक दहा हिऱ्यांपैकी नऊ हिऱ्यांवर सुरतमध्ये प्रक्रिया होते. सुरतच्या हिरे उद्योगाने लाखो नागरिकांना रोजगार आणि आत्मनिर्भरता दिली असून, देशाच्या अर्थव्यवस्थेत व निर्यातीत मोठे योगदान दिले आहे. मुंबईनेही रत्न व आभूषण व्यापाराला निर्यातीची महत्त्वाची धुरा बनविले आहे. भारत डायमंड बोर्स हे भारतीय रत्न व आभूषण उद्योगाच्या जागतिक सामर्थ्याचे प्रतीक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. वर्ष २०२५ मध्ये भारताची रत्न व आभूषण निर्यात २ लाख ४४ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. देशाच्या एकूण व्यापारी माल निर्यातीत या क्षेत्राचा वाटा ६.३ टक्के आहे.

# भारतीय ज्ञानपरंपरेच्या जतन व संवर्धनासाठी एशियाटिक सोसायटीने पुढाकार घ्यावा

■ मुंबई(दै. संध्या)

भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईने पुढाकार घ्यावा. संस्थेकडील ज्ञानसंग्रहाचे डिजिटायझेशन करून हा ज्ञानसंग्रह देशभरातील विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

टाउन हॉल येथे एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या नवनिर्वाचित समितीच्या परिचय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आमदार अमित साटम, प्रवीण दरेकर, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, सचिव विवेक गणपुले आदी उपस्थित होते. यावेळी सुप्रसिद्ध उद्योजक रमेश दंडवते यांनी एशियाटिक सोसायटीच्या बळकटीकरणासाठी ५० लाख रुपयांची मदत केली. त्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, राष्ट्राची स्मृती, इतिहास, संस्कार, भाषा, अभिलेख आणि परंपरांचे जतन करणे महत्त्वाचे आहे. इतिहास आणि सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण करणाऱ्या राष्ट्राची अस्मिता कधीही नष्ट होत नाही. भारतीय ज्ञानपरंपरा अनेक आव्हानांनंतरही टिकून राहिली आहे. ज्ञान कोणत्याही चौकटीत बंदिस्त न राहता मुक्त असले पाहिजे. या ज्ञानाचा उपयोग देशासह संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी व्हावा.

भारतीय इतिहास, पुरातत्त्व, भाषा, तत्त्वज्ञान, साहित्य आणि विज्ञानाचे पुनर्मूल्यांकन भारतीय दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. सोसायटीने महाराष्ट्रातील विद्यार्थी व संशोधकांना संग्रहाच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन द्यावे, ज्ञानसंग्रहाचे डिजिटायझेशन करावे आणि देशातील ग्रंथालये व संशोधन संस्थांना सामायिक व्यासपीठावर जोडावे. तसेच 'ज्ञान भारत राष्ट्रीय पांडुलिपी मिशन'मध्ये सक्रिय सहभाग घेऊन गावागावांत आणि विद्वानांच्या घरांमध्ये जतन केलेल्या दुर्मीळ पांडुलिपींचा शोध, संकलन, संवर्धन व संशोधनासाठी विशेष अभियान राबवावे, असे आवाहनही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एशियाटिक सोसायटीच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी राज्य शासनाचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली. इतिहास हा केवळ भूतकाळ समजून घेण्याचे साधन नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याचा वेग निश्चित करणारा महत्त्वपूर्ण दुवा आहे, असे त्यांनी सांगितले. मानवतेचा प्रवास, विचारांची जडणघडण, अभ्यासपद्धती आणि विविध शास्त्रांची उत्क्रांती यांचे दस्तऐवजीकरण होणे अत्यावश्यक आहे. परकीय आक्रमणांमध्ये नालंदा विद्यापीठाची मोठ्या प्रमाणावर नष्ट झालेली ग्रंथसंपदा आणि त्यासंदर्भातील घटनांतून ज्ञानसंपदेच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित होते. मात्र, अनेक विद्वानांनी उपलब्ध ग्रंथांचे संरक्षण करून ही समृद्ध ज्ञानपरंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली. या परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे ही आजची मोठी जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. नव्या कार्यकारिणीच्या प्रयत्नांमुळे संस्थेला नवसंजीवनी मिळाली असून एशियाटिक सोसायटी नव्या उमेदीने कार्यरत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकण पंचक्रोशीत गणरायाची जल्लोषात प्राणप्रतिष्ठापना

**चाकण : दैनिक संध्या**

वाद्यवृंदाच्या गजरात, ढोल ताशांच्या निनादात गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया असा जयघोष करत मोठ्या भक्तीभावाने चाकण पंचक्रोशीत गणरायाची उत्साहात प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. आपल्या लाडक्या गणरायाचे सोमवारी श्री गणेश चतुर्थीला आगमन होणार असल्याने येथील गणेश भक्तांनी गणेशोत्सवाची जोरदार तयारी केली होती. चाकण शहरात मानाच्या गणपतींची प्रतिष्ठापना नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेवक मंगेश कांडगे, शहर प्रमुख महेश शेवकरी, मनोहर शेवकरी आदींच्या हस्ते करण्यात आली. चाकणसह या भागातील खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, वाकी, मोई, खालुंब्रे, महाळुंगे इंगळे परिसरात प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही गणेश भक्तांनी जल्लोष करत मोठ्या भक्ती भावाने गणरायाची प्राणप्रतिष्ठापणा केली. गणरायाच्या आगमनाने सोमवारी दिवसभर गणेशभक्तांचा आनंद ओसंडून वाहत होता. फुलून गेलेल्या या भागातील रस्त्यांवर केवळ गणेशभक्त दिसत होते. गणेशभक्तांनी यावर्षी रासे, भोसे, शेलगाव, दत्तवाडी, नाणेकरवाडी, खराबवाडी, मेदनकरवाडी परिसरात गणरायाची प्राणप्रतिष्ठा केली. गणेशोत्सवावर यावर्षी जीएसटीसह महागाईचे संकट असले तरी गणेश मंडळाचे कार्यकर्ते तसेच भाविकांच्या उत्सवावर कोणताही परिणाम झालेला दिसत नव्हता.



### आबासाहेब अत्रे प्रशालेत विद्यार्थ्यांनी साकारला ‘श्री ग्रंथ गणेश’ देखावा

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या आनंदाला वाचनाची जोड देत दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या आबासाहेब अत्रे प्रशालेतील ‘बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचनकक्षा’मध्ये विद्यार्थ्यांनी संदर्भतज्ज्ञ व ग्रंथप्रसारक प्रसाद भडसावळे यांच्या संकल्पनेतून ‘श्री ग्रंथ गणेश’ हा अनोखा देखावा साकारला आहे. गणपतीविषयक पुस्तके, कोश, मासिके, नियतकालिके, वृत्तपत्रांतील कात्रणे, छायाचित्रे आणि विविध भावमुद्रांतील लघुस्वरूपातील गणेशमूर्ती हे या देखाव्याचे वैशिष्ट्य आहे. सारंग पवार, अथर्व पाटोळे, वेदांत वायळ, सोहम दीक्षित, अवधूत माने, रिषभ काळे, तेजस जाधव आणि उदय शिंदे या विद्यार्थ्यांनी हा देखावा कल्पकतेने साकारला. विद्यार्थ्यांनी वृत्तपत्रांमधून गणेशाविषयीची माहिती व छायाचित्रे शोधून कात्रणसंग्रह तयार केला. ज्येष्ठ समाजसेविका आशा दत्ताजी शिंदे यांच्या मार्गदर्शनामुळे हा संग्रह समृद्ध झाला, तर ज्येष्ठ अभिनेते डॉ. गिरीश ओक यांच्या वैयक्तिक संग्रहातील लघुस्वरूपातील गणेशमूर्तींमुळे देखाव्याला विशेष आकर्षण प्राप्त झाले आहे. गणेशाच्या आरत्या, स्तोत्रे, कविता आणि सुभाषितांचे सादरीकरणही विद्यार्थी करीत आहेत. “‘श्री ग्रंथ गणेश’ हा केवळ गणेशोत्सवातील देखावा नसून, मुलांना पुस्तकांच्या सहवासात आणून त्यांच्या मनात वाचनाची गोडी, कुतूहल, प्रश्न आणि विचारांची बीजे रुजविण्याचा हा प्रयत्न आहे. पुस्तक मुलांना नवे जग दाखवते, विचार करायला शिकवते आणि कल्पनाशक्तीला पंख देते. डिजिटल युगात माहितीची साधने वाढली असली, तरी चांगल्या पुस्तकांची निवड आणि अर्थपूर्ण वाचनाचे महत्त्व कमी झालेले नाही; उलट माहितीच्या वाढत्या प्रवाहात ते अधिकच आवश्यक झाले आहे,” असे या उपक्रमाचे संकल्पक प्रसाद भडसावळे यांनी सांगितले.

# तरुणाईच्या हातात समाज माध्यमे आणि बदलती राजसत्तेची आशादायक दिशा - रवींद्र पोखरकर

■ पुणे (दै. संध्या)

समाज माध्यमांची वाढती लोकप्रियता, तरुणांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम, माहितीचा वेगवान प्रसार तसेच समाज माध्यमाद्वारे जनमत निर्मिती याविषयी अभिव्यक्ती यूट्यूब चैनलचे निर्माते मा. रवींद्र पोखरकर, ठाणे यांनी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 123 व्या परिवर्तन व्याख्यानमालेत "समाज माध्यमे- तरुणाई आणि राज्यकर्ते" या विषयावर आपले मत व्यक्त केले.



आजची समाज माध्यमे ही तरुणाईच्या विचार विश्वाचा महत्त्वाचा भाग बनली आहे, याच्या वापराला नैतिकतेची जोड दिली तर साधं मत असो किंवा मोठी आंदोलने असो, ती यशस्वी होतातच. अशाच प्रकारचे ज्वलंत व उपयुक्त विषय घेऊन मागील वीस वर्षापासून परिवर्तन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे, असे विचार कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत महाविद्यालयाचे प्राचार्य रा.बा.देशमुख यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कल्याणी परबत तर पाहुण्यांचा परिचय कु. साक्षी ढमढेरे यांनी करून दिला.

संस्थेचे चेअरमन मा.राजेंद्रदादा पवार यांनी आमंत्रित व्याख्याते मा.राजेंद्र पोखरकर यांचा तर विश्वस्त सुनंदा पवार यांनी सौ. पोखरकरांचा संस्थेचे प्रतिक रोप देऊन सत्कार केला. समाज माध्यमांचे तरुणाईच्या विश्वातलं महत्त्व व त्यांच्या मदतीने अन्यायाविरुद्ध तरुणांचा मोठा जागर कौतुकास्पद आहे, ही सामाजिक सकारात्मकतेची नांदी आहे. तरुणांचे प्रत्येक पाऊल हे असमानता, अत्याचाराला खतपाणी घालणाऱ्या सत्ताधाऱ्यांना घाम फोडणारे आहे. आमच्या काळात अशी माध्यमं अस्तित्वात नव्हती, पण आम्हाला कौटुंबिक पाठबळ, उत्कृष्ट सामाजिकता आणि आदर्श शिक्षक हे मिळाल्यामुळे वाचन आणि अनुभवांचे चांगले संस्कार ते आमच्यावर करू शकले आणि यातूनच आम्ही घडलो. महात्मा गांधीजींनी दांडी यात्रा सुरू केल्यानंतर त्यांच्या मागे लाखो लोक जोडले गेले, हे केवळ मानवी नेटवर्कमुळेच शक्य झाले. आज मात्र तशी परिस्थिती नाही. आज कोणताही विचार सोशल मीडियाच्या माध्यमातून एका क्षणात लाखो लोकांपर्यंत लगेचच पोहोचवता येतो. यामुळे जागृती आली,समस्यांना वाचा फोडली जात आहे. पण सोशल मीडिया वरची कोणतीही पोस्ट असो, त्याची पूर्णपणे शहानिशा करा. अंधपणाने त्याच्यावर विश्वास ठेवून कोणतीही कृती करू नका. जिथे अन्याय होतो आहे, तिथपर्यंत आपण पोहोचले पाहिजे. ज्या महिलांवर अन्याय झाला आहे त्या महिलांची जात- धर्म विचारत तुम्ही वेळ वाया घालवणार का ? याला महिलांचा सन्मान म्हणत नाहीत. धार्मिक एकोपा जपत अन्यायाच्या मुळापर्यंत जाऊन तो समुळ नष्ट करण्याकडे तरुणाईने वळावं. खऱ्या खोट्याची समीक्षा करा. आजची पिढी ही विज्ञाननिष्ठ पिढी आहे, भोंदूगिरीच्या आहारी जाऊन सार्वजनिक अधःपतन होऊ देऊ नका. तरुणाईला विश्वासात घेऊन राज्यकर्त्यांनी पैसा खर्च करताना विकासात्मक प्रधान्यक्रम ठरवा आणि नियोजनबद्ध पद्धतीने पावले उचला.

व्याख्यानाच्या समारोपात समाज माध्यमांचा विवेक पूर्ण आणि सकारात्मक वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. तरुणाई ही समाजाची ऊर्जा आणि भविष्याची दिशा ठरवणारी शक्ती आहे, त्यामुळे समाज माध्यमांच्या आहारी न जाता त्यांचा ज्ञान, संवाद, सर्जनशीलता आणि सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावीपणे वापर करावा. समाज माध्यमे आपल्या हातातील साधने आहेत ते आपल्यावर राज्य करू नयेत, तर आपण त्यांचा सुजाणपणे वापर करून समाजाच्या विकासाला दिशा द्यावी, या विचाराने व्याख्यानाचा समारोप झाला.

कार्यक्रमाला उपस्थितांचा भरभरून प्रतिसाद लाभला. वक्त्याच्या विचारांना श्रोत्यांनी मनापासून दाद देत व्याख्यानाचा प्रत्येक क्षण अनुभवला. उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक प्रतिसादामुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले.

## लेण्याद्री येथे श्रींचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात

■ जुन्नर (दै. संध्या)

सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी भाद्रपद श्री गणेश चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील श्री गिरीजात्मजाच्या दर्शनासाठी भाविकांची पहाटेपासून मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाद्रपद श्री गणेश चतुर्थीचे औचित्य साधून देवस्थान ट्रस्टच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरुप प्राप्त झाले होते. दिवसभरात असंख्य भाविक भक्तांनी ‘श्री गिरीजात्मज’ गणेशाचे दर्शनाचा लाभ घेतला.



श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने पहाटे ०६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे यांच्या हस्ते श्रींचा महाअभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर भाविक भक्तांनी श्रींचे दर्शनाचा लाभ घेतला. भाद्रपद श्री गणेश चतुर्थीनिमित्त सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत मंदिरात ह.भ.प. नामदेव महाराज वाळके यांचे देव जन्माचे कीर्तन झाले. त्यानंतर पारंपारिक पद्धतीने श्री गणेश जन्मोत्सव साजरा करण्यात आला. तसेच देवस्थान ट्रस्टचेवतीने भाविक भक्तांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त ‘श्री गिरीजात्मज’ गणेशाच्या मुर्तीस व मंदिर परीसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता मुंबई येथील फळांचे व्यापारी राम मारुती कोकणे यांनी २ कॅरेट विविध प्रकारची फळे तसेच गोळेगाव येथील संजय पांडूरंग वाणी यांनी २ कॅरेट केळी प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२.१५ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले तसेच भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सेवा पुरवण्यात आल्या.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहिदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने व देवस्थानचे कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने भाविक भक्त व ग्रामस्थ उपस्थित होते. भाविक भक्तांना दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थानच्या वतीने केले होते.

दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला तसेच जुन्नर परिसरातुन व पुणे, नगर, मुंबई, ठाणे, नाशिक येथून मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजी ऋषीपंचमी निमित्त सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत भाविक भक्तांकरीता सामूहीक श्री गणेश अथर्वशीर्ष पठण आयोजीत केलेले आहे. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

## जेजुरीत जल्लोषात गणरायाच्या आगमनाचे स्वागत

■ जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत गणरायाचे जल्लोषात ,वाजत गाजत स्वागत करण्यात आले. गणरायाच्या आगमनाने सर्वत्र आनंदाचे आणि जल्लोषाचे वातावरण होते. सुमारे चाळीस सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी रात्री उशिरा पर्यंत श्री गणेशाची प्रतीस्थापना केली. श्री गणेशाची मूर्ती घरी घेवून जाण्यासाठी भाविकांनी सकाळपासूनच मुख्य बाजापेठेत गर्दी केली होती. घरोघरी वाजत गाजत श्री गणेशाची मूर्ती घेवून जावून गणेशाची प्रतीस्थापना करण्यात आली.तर सुमारे चाळीस सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी रात्री उशिरा पर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढून गणेशाची स्थापना केली. श्री मार्तंड देवसंस्थान च्या वतीने जेजुरी शहरातून वाजत गाजत गणपतीची मिरवणूक काढून जेजुरी गडावर श्री गणेशाची धार्मिक विधी करून स्थापना केली. यावेळी विश्वस्त, अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. जेजुरी व पंचक्रोशीत मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा होतो, त्यामुळे गणेशाच्या मूर्तीनाही मोठी मागणी असते. जेजुरी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, कुंभार आळीत गणपती विक्रीची, तसेच सजावटीच्या साहित्यांची दुकाने गर्दीनी फुलून गेली होती. गणेश उत्सवा निमित्त सुमारे पाच हजारहून अधिक गणेश मूर्तीची विक्री झाली असल्याचे मुर्तीकार तुषार कुंभार, यांनी सांगितले. घरोघरी गणेशाची सजावट ,व मूर्तीची स्थापना करण्यात भाविक मग्न झाल्याचे चित्र शहरात पाहण्यास मिळाले. सार्वजनिक गणेश मंडळांबरोबरच जेजुरीत घरोघरी गौरी गणपतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गौरी गणपती समोर आकर्षक सजावट करण्यात गणेशभक्त रममाण झाले आहेत.



# सार्वजनिक उपक्रम समितीकडून आमदार कुल यांच्या नेतृत्वाखाली विकास प्रकल्पांची पाहणी

■ यवत (दै. संध्या)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीचे अध्यक्ष तथा दौंडचे आमदार ॲड. राहुल कुल यांच्या नेतृत्वाखालील समितीने गडचिरोली, चंद्रपूर आणि नागपूर या तीन जिल्ह्यांचा आपला महत्त्वपूर्ण अभ्यास दौरा नुकताच पूर्ण केला. विदर्भातील औद्योगिक विकास, वन व्यवस्थापन, कौशल्य विकास उपक्रम, पायाभूत सुविधा, सिंचन प्रकल्प आणि विविध शासकीय महामंडळांच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेणे, हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश होता.

या अभ्यास दौऱ्याची सविस्तर माहिती देताना आमदार ॲड. राहुल कुल यांनी सांगितले की, नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्यावरणपूरक वापर करणे आणि शासकीय उपक्रमांच्या कामकाजात पारदर्शकता आणून विकासकामांना गती देणे यावर समितीने प्रामुख्याने भर दिला आहे.

अभ्यास दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात समितीने गडचिरोली जिल्ह्यातील कोणसारी येथील 'लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लि.' च्या 'डायरेक्ट रिड्यूस्ड आयर्न' आणि पेलेट उत्पादन प्रकल्पाला भेट दिली. यानंतर सूरजागड येथील लोह खनिज खाण प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या प्रकल्पांमुळे स्थानिक आदिवासी आणि सुशिक्षित तरुणांच्या स्थलांतराला आळा बसून मोठ्या प्रमाणावर थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाला आहे. प्रकल्पात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश आमदार कुल यांनी व्यवस्थापनाला दिले.

याशिवाय, हेड्री, जि. गडचिरोली येथे 'लॉयड्स कलियाम्मल मेमोरियल हॉस्पिटल'मधील एमआरआय, सिटी स्कॅन, एनआयसीयु, पीआयसीयु या आधुनिक आरोग्य सुविधांची पाहणी करण्यात आली. तसेच स्थानिक शाळा, 'एलटी गोंडवाना' उपजीविका प्रकल्प आणि 'वन्या गारमेंट्स' या महिला कपडे निर्मिती केंद्राला भेट देऊन महिला सक्षमीकरणाचा आणि CSR निधीतून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला.



चंद्रपूर दौऱ्यादरम्यान समितीने बल्लारशाह येथील शासकीय लाकूड डेपोला भेट दिली. भारताचे नवीन संसद भवन आणि अयोध्येतील श्री राम मंदिर यांच्या बांधकामासाठी याच डेपोतून उत्कृष्ट दर्जाच्या सागवान लाकडाचा पुरवठा करण्यात आला होता. समितीने डेपोच्या कार्यप्रणालीची आणि लाकूड पुरवठ्याच्या तांत्रिक बाबींची पाहणी केली.

त्यानंतर 'चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी' येथे बैठक पार पडली. वन संरक्षणासाठी जीआयएस, जीपीएस, ड्रोन आणि रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर तसेच मानव-वन्यजीव संघर्ष निवारण प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आला. प्रबोधिनीत स्थानिक युवकांसाठी चालवल्या जाणाऱ्या ऑटोमोबाईल, हॉस्पिटॅलिटी, टूर गाईड आणि जेसीबी ड्रायव्हिंग यांसारख्या कौशल्य विकास उपक्रमांचे आमदार कुल आणि समिती सदस्यांनी विशेष कौतुक केले. नागपूर येथे समितीने मल्टी - मॉडेल इंटरनॅशनल कार्गो हब अँड एअरपोर्ट नागपूर (मिहान) प्रकल्प आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसराची पाहणी केली. विमानतळाची प्रवासी क्षमता टप्प्याटप्प्याने ३० ते ५० दशलक्षेपर्यंत वाढवण्याच्या मास्टर प्लॅनची माहिती घेण्यात आली.

मिहानमध्ये आतापर्यंत ₹८,५०० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून १.२६ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण झाले आहेत. टाटा अॅडव्हान्स्ड, रिलायन्स राफेल असेंब्ली, इन्फोसिस यांसारख्या आघाडीच्या प्रकल्पांच्या पाहणीसोबतच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन वसाहतींमधील नागरी सुविधा वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले.

पुढे समितीने खापरी ते रहाटे कॉलनी दरम्यान नागपूर मेट्रोने प्रवास करून प्रवासी सेवा व तांत्रिक सुविधांचा आढावा घेतला. तसेच मिहानमधील Infosys या जागतिक पातळीवरील अग्रगण्य IT कंपनीला आणि भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर (IIM) या नामांकित संस्थेला भेट देऊन आधुनिक व्यवस्थापन व रोजगार निर्मितीवर सखोल चर्चा केली.

सिंचन भवन, नागपूर येथे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिकाऱ्यांच्या समवेत झालेल्या बैठकीत विदर्भातील प्रलंबित सिंचन प्रकल्प वेळेत पूर्ण करून शेवटच्या घटकातील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचवण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ अधिकाऱ्यांच्या समवेत खनिज संपत्तीचा योग्य वापर करून शासकीय महसुलात वाढ करणे आणि कोळसा पुरवठ्यात पारदर्शकता आणण्यावर चर्चा झाली. तसेच महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ अधिकाऱ्यांच्या समवेत विदर्भातील विणकरांचे कल्याण, उत्पादनांचे विपणन आणि हातमाग क्षेत्राला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

या दौऱ्यात समिती अध्यक्ष आमदार ॲड. राहुल कुल यांच्यासमवेत आमदार श्री. मिलिंद नार्वेकर, आमदार श्री. रईस शेख, आमदार श्री. रणधीर सावरकर, आमदार श्री. हेमंत ओगले, आमदार श्री. मोहन मते, आमदार श्री. संभाजीराव कदम-कोहळीकर, आमदार श्रीमती सुलभाताई खोडके, आमदार श्री. अभिजित वंजारी या समिती सदस्यांसह संबंधित विभागांचे वरिष्ठ शासकीय अधिकारी व महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक उपस्थित होते.